# माणूस

शनिवार । २ ऑगस्ट १९८०

एक रुपया

## बंगलोरमध्ये झालेला दलितांचा

# एक धक्कादायक परिसंवाद

पृष्ठ ७

□

पक्ष बाजूला राहिले.

नव्या जुळण्या—फेरजुळण्या झाल्या,

अखेरच्या रात्री बरंच काही घडून गेलं,

**आणि**

?..................वार्ता पुण्याची............→

पुणे वार्ता

# महापौर–उपमहापौर निवडणूक कशी लढली गेली ?

एक वार्ताहर

पुणे महानगराचं महापौरपद मिळवणं म्हणजे एक अग्निदिव्यच असतं. येरा गबाळयाचं हे काम नाही. कारण त्यासाठी बरंच काही करावं लागतं. पाप करावं लागतं, पुण्य करावं लागतं. पैशाची गंगा वाहती ठेवावी लागते. दारूची पिपे येतात, रिती होऊन जातात. नाचून नाचून नृत्यांगनांचे पाय थकून जातात; पण राजकीय नृत्यात मग्न झालेल्यांना हे खेळ नवलाईचे वाटत नाहीत. 'नगरसेवकां' ना तर नाहीच नाही. निवडून आल्यापासून पुढची पाच वर्षं 'वरं स्वहितम् ध्येयम्' हे ब्रीदवाक्य ठेवून त्यांची लोकशाही वाटचाल चाललेली असते. महापौर–उपमहापौरपद हे त्या वाटचालीतलेच काही टप्पे असतात. (काही अपवाद असतात; पण अपवादच ते !) अशा टप्प्यांमध्ये नाटयमय निकाल हे पुण्यनगरीच्या महापालिकेतलं एक खास वैशिष्टय आहे. त्या दृष्टीनं या महापालिकेचं सभागृह 'जादूचं सभागृह'च म्हणावं लागेल. कारण इथे केव्हा, कसा आणि का निकाल लागेल, हे सांगता येणं भल्याभल्यांना अवघड जातं. बहुमत असलेल्या पक्षाचा उमेदवार इथे सहजगत्या पराभूत झालेला दिसतो, तर अल्पमतातला उमेदवार विनासायास निवडून आल्याचा चमत्कारही इथे पहायला मिळतो. काहीही घडण्याची आणि घडविण्याची सुप्त शक्यता या महानगरीच्या महापालिकेच्या सभासदाच्या उदरी सामावलेली असते. म्हणूनच 'आयुष्यात प्रथमच नगरसेवकासाठी काय काय पापं केली', हे सांगतांना नाना मिठ्ठापेल्लीसारखा एखादा पंढरीभक्त अश्रू ढाळताना दिसतो आणि त्याच्याविरुद्ध महापौरपदी निवडून येणारे 'पूनम हॉटेल'चे मालक निळूभाऊ लिमये कसलाच गौप्यस्फोट न करता शांत बसतात, यात आश्चर्य वाटण्यासारखं इथे काहीच नाही. कारण आश्चर्य तरी कशाकशाचं आणि किती करत बसणार ? दर वेळी इथला खेळ नवा असतो, पात्रं नवी असतात; पण डाव मात्र बहुतेकसा ठरल्यासारखाच असतो.

इथल्या महापौर–उपमहापौरपदाला हीही एक परंपरा आहे, हे विसरून चालणार नाही. किंबहुना दरवर्षी या पदांसाठी होणाऱ्या निवडणुकीची 'सुरस आणि चमत्कारिक' कहाणी ऐकत गेलं की या परंपरेचा विसर पडणंही शक्य नाही. शहरातले हे अत्युच्च मान मिळण्यासाठी पडद्यामागे मोठं रंगतदार नाटय मंडळी मोठया कुशलतेनं खेळत असतात !

यंदा या पदासाठी २० जुलैला झालेली निवडणूकही याला अपवाद ठरली नाही. यंदा तिला आणखीही एक रंग होता 'सॅटरडे क्लब' विरुद्ध 'गोल्डन गँग' या सामन्याचा. म्हणून ती विशेष गाजली. या सामन्याची पार्श्वभूमी पाहण्यासारखी आहे.

गेल्या पाच वर्षांत काही बलाढय नगरसेवकांनी एक गट बनवला. या गटात येण्यासाठी अमुक एका पक्षात असण्याचं बंधन नव्हतं. पत्त्यांची माहिती असणं, सुरेख 'पार्टी' झोडता येणं आणि दमात कामं करून घेता येणं, एवढयाच त्यातल्या प्रवेश-पात्रतेच्या कसोटया असल्याचं बोललं जातं. महापालिकेत नव्यानंच आलेल्या तरुण सदस्यांना हा वरचष्मा मानवण्यासारखा नव्हता. त्यांनीच या गटाला 'गोल्डन गँग' 'सोनेरी टोळी' म्हणायला सुरुवात केली. हे नामकरण केलं सुरेश नाशिककर यांनी.

हळूहळू विविध पक्षातली ही तरुण मंडळी एकत्र यायला सुरुवात झाली. सात–आठ महिन्यांच्या अनुभवानंतर शांतिलाल सुरतवाला यांच्या नेतृत्वाखाली एका शनिवारी पेशवे पार्कजवळील 'केतकी हॉटेल'मध्ये, दहा तरुण नगरसेवकांची पहिली बैठक झाली आणि तिथेच 'सॅटरडे क्लब'चा जन्म झाला.


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे
अंक : नववा
२ ऑगस्ट १९८०
किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

तेव्हापासून महापालिकेत ' सॅटरडे क्लब ' विरुद्ध ' सोनेरी टोळी ' असं वातावरण तयार होऊ लागलं.

प्रत्यक्षात या दोन्ही गटांचा सामना व्हायची वेळ आली ती स्थायी समितीच्या सदस्यांच्या निवडणुकीच्या वेळी त्या वेळी सॅटरडे क्लबच्या सदस्यांनी आपापल्या पक्षांवर दबाव आणून आपल्याला हवे ते उमेदवार निवडून आणले. शिवसेनेचे उल्हास काळोखे आणि उल्हास ढोले पाटील या निवडणुकीत पराभूत झाले.

या स्थितीतच स्थायी समितीच्या अध्यक्षपदाची निवडणूक झाली. तेव्हा क्लबने भारतीय जनता पक्षाचे उमेदवार काका वडके यांना पाठिंबा दिला. इंदिरा काँग्रेसनंही मतदानाचा अंदाज घेऊन काकांना पाठिंबा दिला आणि काका विजयी झाले. महापौरपदाच्या निवडणुकीच्या दृष्टीनं ही रंगीत तालीमच ठरली.

या पार्श्वभूमीवर महापौर-उपमहापौर-निवडणुकीचे वारे वाहू लागले. पहिल्या वर्षी जनता पक्ष आणि काँग्रेस (अरस) यांनी या पदासाठी युती केली होती. त्यानुसार पहिल्या वर्षी महापौरपद जनताचे पांडुरंग तरवडे यांना मिळालं होतं. या वर्षी अरस काँग्रेसचा क्रमांक होता. दरम्यानच्या काळामध्ये जनताचे तुकडे झाले होते. भारतीय जनता व जनता जे. पी यांच्यात महापालिकेतही वाद सुरू होते; परंतु दोघांनाही अरस काँग्रेसचा महापौरपदावरचा हक्क मात्र मान्य होता. त्यामुळे या बाबतीत त्यांची आघाडी टिकून असल्यासारखीच होती. त्यातच या वेळी नागरी संघटनाही या आघाडीत आली. उपमहापौरपदाच्या बदल्यात या युतीत सामील होण्याचा निर्णय नागरी संघटनेनं घेतला. त्यामुळे या पुलोद आघाडीचं संख्याबळ ३३ वरून ४२ वर गेलं. या आघाडीत महापौरपद काँग्रेसला आणि उपमहापौरपद नागरी संघटनेला हे निश्चित झालं. स्थायी समितीच्या अध्यक्षपदाच्या वेळी साथ देणाऱ्या इंदिरा काँग्रेसशी आता सामन्याची वेळ आली. दोन्ही गटांच्या त्या दिशेनं हालचाली सुरू झाल्या.

इंदिरा काँग्रेसनं ' हॉटेल सपना ' वर तळ ठेवला, तर पुलोद आघाडी ' पूनम हॉटेल ' मध्ये डेरेदाखल झाली. गेल्या वर्षी पुलोदच्या सेनेचा मुक्काम ' सपना ' वर होता आणि हे हॉटेल ' लकी ' ठरलं होतं. म्हणून यंदा इंदिरा काँग्रेसनं पाच हजार रुपये भरून आधीच हे हॉटेल राखून ठेवलं होतं. ( गेल्या वर्षीचं ' सपना 'चं बिल वसूल व्हायला आठ महिने लागले होते ! ) त्यामुळे आघाडीचं ' पूनम ' हेच केंद्र होतं. मात्र त्याबरोबरच त्यांनी पेशवेपार्कजवळच्या ' हॉटेल कावेरी ' मध्ये आपलं उपकेंद्रही ठेवलं होतं. अशा प्रकारे दोन्ही बाजूंची सूत्रं पक्षाच्या कचेऱ्यांमधून नव्हे, तर हॉटेलांमधून हलत होती आणि बडीबडी मंडळी त्यात लक्ष घालत होती.

मुंबई आणि सोलापूर या महापालिकांच्या पाठोपाठ पुण्याची ही निवडणूक माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे महाराष्ट्रातले एक प्रभावी नेते शरद पवार यांनी प्रतिष्ठेची मानली होती. इंदिरा काँग्रेसनंही त्यांना पराभूत करण्याचा निर्धार केला होता त्यामुळे शरदराव महापौरपदाच्या उमेदवारीची माळ कोणाच्या गळ्यात घालतात, याबद्दल उत्सुकता होती.

शरदराव पुण्यात आले. आपल्या पक्षाच्या सहाही इच्छुक सदस्यांना त्यांनी ' सर्किट हाउस ' वर बोलावून घेतलं. ' तुम्हीच एकमतानं उमेदवार ठरवा ! ' असं सांगून त्यांना एका बाजूच्या खोलीत त्यांना पाठवून दिलं; पण दोन मिनिटांतच ते सर्वजण बाहेर आले. त्यांनी शरदरावांना सांगितलं, ' आमच्यात एकमत होत नाही ! ' म्हणजेच आता शरदराव ठरवतील त्यालाच उमेदवारी मिळणं निश्चित झालं.

शरदरावांनी महापालिकेतील पक्षनेते शिवाजीराव भोसले, पक्षाध्यक्ष शिवाजीराव ढमढेरे यांच्याशी बोलणी केली; पण ' वडारवाडीसम्राट ' एस्. के. कुसाळकर शरदरावांना भेटले आणि उमेदवार केव्हा ठरला, हे कोणाला कळलंसुद्धा नाही. फक्त ' साहेबां 'नी उमेदवाराचं नाव असलेलं बंद पाकीट दिलं व ' अर्ज भरण्यापूर्वी एक तास ' ते फोडायला सांगितलं.

' एस्. के. कुसाळकर ही महापौरपदाची किल्ली आहे ' असं म्हणतात. त्यांचे म्हणे या सभागृहात सात ते आठ स्वतःचे सदस्य आहेत. अर्थात हा माणूस गरीबापासून पंतप्रधानापर्यंत सर्वांच्या उपयोगी पडतो. तत्कालीन पंतप्रधान चरणसिंगांच्या सभेला गर्दी जमेना, तेव्हा याच कुसाळकरसेठनी पाच ट्रक माणसं पाठविली होती. अशा या ' शेठ 'शी शरदरावांची भेट झाल्यावर ठरलेला उमेदवार ' पाकिटबंद ' झाला होता !

दरम्यान इंदिरा काँग्रेसमध्ये शरदरावांचे उजवे हात समजल्या जाणाऱ्या मणियार-चोरडिया जोडीनं ' आमचे उमेदवार बाळासाहेब शिरोळे ठरले ' असं सांगायला सुरुवात केली होती. त्यामुळं ' ही लढत भारी पडेल ' म्हणून विठ्ठल लडकत, बबन पडवळ, शंकर मिठापेल्ली या इच्छुकांनी सरळ सरळ माघार घेतली व नारायण खराडे यांना पाठिंबा दिला; पण काँग्रेसच्या उमेदवाराचं नाव फुटल्यावर मात्र ही मंडळी हळहळत बसली !

शिवाजीराव भोसलेंनी उपमहापौर मोहन पवार यांच्या खोलीत शरदरावांनी दिलेलं बंद पाकिट फोडलं. त्यात सुरेश तौर यांचं नाव निघाल्यामुळं ते उमेदवार ठरले. त्याबरोबर सुरेश आगरवाल यांनी ' हॉटेल सपना 'त फोन केला. तेव्हा इंदिरा काँग्रेसमधील या नेत्यांना धक्का बसला. कारण समोरून आलेला उमेदवार सोपा होता. लढलो असतो तर हा सामना खेळणं अवघड नव्हतं, असं त्यांना वाटत होतं. त्यामुळंच ' नारायण खराडे निवडून आले तर ? ' हा प्रश्न मनात घोळवतच ते अर्ज भरण्यासाठी दाखल झाले.

या दोन उमेदवारांबरोबर अपक्ष उल्हास ढोले पाटलांनीही महापौरपदासाठी अर्ज भरला.

उपमहापौरपदासाठी अखेर नागरी संघटनेचे डॉ. सतीश देसाई व अपक्ष केशवराव पवार यांची लढत ठरली. त्यापूर्वी जनता पक्षाच्या दत्ता एकबोटे यांनी उपमहापौरपदासाठी माघार घेताना ' समाजवादी ' नाटच केलं होतं.

निळूभाऊंनी त्यांना जेवायला बोलाविलं होतं. डॉ. रमेश शहाबरोबर एकबोटे बाहेर थांबले, तर डॉ. देशपांडे राम तुपेंबरोबर जेवून घरी गेले. शहर जनता पक्षाचे अध्यक्ष दि. ज. खिलारे तर उशीरा रात्री आले होते. एकबोटेंनी उमेदवारीही दाखल केली होती; पण शेवटी माघार घेतली. दुरंगी सामना उभा राहिला.

त्यातच शरदरावांचे एकनिष्ठ सेवक मानले जाणारे बबनराव किराड महापौरपदाची उमेदवारी मिळत नाही, हे पहाताच पत्नी-

सह इंदिरा काँग्रेसमध्ये दाखल झाले. 'शरदराव मराठ्यांना संधी देतात, इतरांना नाही,' असा आरोप त्यांनी केला तेव्हा 'तेवढा आरोप करू नका, बाकी काहीही म्हणा!' अशी विनंती शरदरावांनी केली होती. ती आठवताना मोहन धारिया, विठ्ठलराव गाडगीळ, सुरेश कलमाडी ही नावं सहज मनात तरळून जातात.

अशा तऱ्हेनं पहिली फेरी पूर्ण झाली आणि निवडणुकीचं वातावरण तापू लागलं. 'पूनम'च्या नवीन हॉलमध्ये अंतोन जातीनं सर्व व्यवस्था पहात होता. भारतीय जनता पक्षाची मंडळी घरून जेवून येऊन हजेरी लावत होती, तर घरी जेवून येऊनही दुसऱ्या संघटनेतले एखादे सदस्य सतरा मँगो आइस्क्रीम पेंजेवर खात होते. बंद खोलीमध्ये मात्र पत्त्याचे डाव टाकले जात होते. आतबाहेर होताना शंभराच्या नोटा सुट्या मागितल्या जात होत्या.

'हॉटेल कावेरी' ही असंच गजबजून गेलं होतं. नेतेमंडळी जातीनं तिथली व्यवस्था पहात होती. शेजारच्या एका हॉटेलमधून तिथं सर्व काही पुरविलं जात होतं तीन दिवसात तिथं सोडयाचे ४० क्रेट लागले. रुबी, नूरी मुमताजसारख्या तरुणींना या निवडणुकीत रस होता की काय कुणास ठाऊक! कारण तीन–चार दिवस त्या आसपास घोटाळताना दिसत होत्या.

'हॉटेल सपना'ची स्थिती याहून फारशी वेगळी नव्हती. नारायण खराडे स्वतः प्रयत्न करीत होते. अमिनुद्दिन पेनवाले यांना विधानसभेवर निवडून आणण्यात महत्त्वाचा वाटा खराडेंनी उचलला होता त्यामुळं नाराज असलेले इंदिरा काँग्रेसचे 'छत्रपती' त्याचा हिशेब आता चुकता करणार होते, हे खराडेंना माहीत नव्हतं.त्यांना ते कळायला उशीर झाला. आपल्या मागं 'मराठा चेंबर' आहे, आमदार अमिनुद्दिन पेनवाले आहेत, मंडईच्या अप्पा थोरातांचा आशीर्वाद आहे, अशा समजुतीत ते होते; पण याच चौकडीनं वसंत थोरातांसारख्याला रडविलं होतं, याची त्यांना कल्पना नव्हती. म्हणूनच ते विजयाची आशा बाळगत होते. निवडणूक तोंडावर येऊन ठेपली होती.

निवडणुकीच्या उलाढालीत अखेरची रात्र ही 'कत्तलची रात्र' असते. खरं म्हणजे या रात्रीमध्येच महापौरपदाचा निकाल ठरत असतो.

उपमहापौरपदाचे उमेदवार डॉ. सतीश देसाई यांनी याच सुमाराला काँग्रेसबरोबर आतून हातमिळवणी केली. ही बातमी कुसाळकरशेठकडे पोहोचताच रात्री त्यांच्या बंगल्यावर ताबडतोब बैठक झाली. अपक्षांना निमंत्रण गेलं. देवाण-घेवाण होऊन निर्णय झाला. 'वर छत्रपती खाली छत्रपती!' त्या वेळी डॉ. देसाई शांत झोपले होते. त्यांना आपण सहज निवडून आल्यासारखंच वाटत होतं. या निर्णयाची त्यांना कल्पनाच नव्हती!

'हॉटेल सपना'वर अप्पासाहेबांनी तळ ठोकला होता. नागरी संघटनेचे एक नेते असलेले माजी महापौर वसंतराव थोरात 'प्रथमच सपना'वर दिसत होते, तर चंद्रकांत छाजेडांनी पुलोदच्या तळामधून चार–पाच नगरसेवकांचे हात हातात घेतले होते. विचार पक्का झाला होता.

या साऱ्यातच त्या रात्री नारायण खराडेंना 'अलका टॉकीज'-समोरील बसस्टॉपवर बोलावल्याचा निरोप आला. उल्हास ढोले, उल्हास काळोखे, विठ्ठल लडकत, प्रकाश ढेरे वगैरे दहा–बारा सदस्य तिथे बैठकीला हजर होते. खराडेंनी त्यांची खूप विनवणी केली; पण उशीर झाला होता. बैठक दोन वाजता संपली; पण त्यांना यश आलं नाही.

डॉ. देसाई यांच्या मित्रमंडळानंही असं कार्य सुरू केलं होतं. विद्यापीठ–मल्ल सुरेश नागरे, भाडी–व्यावसायिक बाळ सातपुते, वार्ताहर प्रल्हाद (बंड्या) सावंत, छायाचित्रकार प्रभाकर पागे हिंडत होते; पण कुणाचाच काही थांगपत्ता लागत नव्हता!

त्या रात्री बरेच व्यवहार झाले पूर्वी झालेले व्यवहार तुटले, नवे जोडले गेले. या साऱ्यात हजारो रुपयांची उलाढाल झाली. काहींनी काहींना पाच हजार रुपये 'उसने' दिले, तर काहींनी काहींना तीन हजार रुपये 'उसने' दिले. कुसाळकरशेठ भरल्या खिशांनी हिंडत होते.

त्याच रात्री माजी खासदार संभाजीराव काकडे या निवडणुकीच्या काळात प्रथमच पुण्यात आले. आल्याबरोबर डॉ. देसाई त्यांच्याकडे दाखल झाले. पाठोपाठ सुरेश तौरही आले. बैठक सुरू झाली. संभाजीराव प्रश्न विचारत होते. उत्तरं चालली होती. अखेर 'लाला'नी दोघांना ग्रीन सिग्नल दिला. कट्टर विरोधक असलेले शरद पवार आणि संभाजीराव काकडे अशा तऱ्हेनं एकत्र आले आणि शरद पवारांचा पाठिंबा असलेल्या उमेदवारांना निवडून आणण्याच्या निर्धारानं लाला त्या बैठकीतून बाहेर पडले. आता या दोघांचं यश निश्चित मानायला हरकत नव्हती.

त्याच वेळी 'पूनम' वर सगळे शरद पवारांची वाट पहात होते. महाराष्ट्र प्रदेश जनता पक्षाचे अध्यक्ष बबनराव ढाकणे, माजी गृहराज्यमंत्री भाई वैद्य, विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते प्रा. ग. प्र. प्रधान येऊन दाखल झाले होते; पण शरदरावांनी गुंगारा दिला. ते तिकडे फिरकलेच नाहीत! कुणी म्हणाले, 'बबनराव किराडांच्या पक्षांतराचा त्यांना धक्का बसला होता.' खरे–खोटे कोण जाणे?

इतर उमेदवारांप्रमाणेच केशव पवारही गप्प बसले नव्हते. आपल्याला इंदिरा काँग्रेसवाले फसविणार, अशी त्यांना दाट शंका होतीच. त्यांचे राजकीय गुरु शिवाजीराव ढेरे हे महापालिका राजकारणातले तज्ज्ञ समजले जातात. ते पवारांना सल्ले देत होते, तर काशिनाथ पेहलवान सर्व शक्तीनिशी त्यांच्या मागे उभे होते. त्यांच्याही भेटी–गाठी अखेरच्या रात्री जोरात चालल्या होत्या.

बरंच काही उदरात सामावून ती रात्र संपत आली. आता पहाटे पहाटे 'देवदर्शना' ची वेळ होती. नागरी संघटनेचे नगरसेवक थेऊरला गेले. गणपतीनं आशीर्वाद दिला. त्यांना उजवा कौल मिळाला. त्या आनंदातच गाड्या उत्साहानं पुण्याकडे परतल्या.

सुरेश तौर कसबा गणपतीचं दर्शन घेऊन बाहेर पडले, तर नारायण खराडे मात्र सारसबागेला आले. विविध मंदिरं, दर्गे यांचं दर्शन घेत उमेदवार शेवटचा हात फिरवीत आपापल्या हॉटेलवर येऊन दाखल झाले.

'पूनम' वर शरद पवारांनी भोजनापूर्वी 'मार्गदर्शन' केलं. ज्यांनी यशवंतरावांना ते फुल फॉर्ममध्ये असताना याच 'पूनम' मध्ये झुगारून दिलं ते नगरसेवक आपलं तरी ऐकणार का, हा शरदरावांपुढे

मलपृष्ठ १ वर

# बुद्धिवाद आणि मृत्यू

श्री. ग. मा.

म्हातारपण येऊन, सर्व निरवानिरव होऊन माणसे गेली तरी आपण अशाच्या जाण्यामुळे 'पोकळी' निर्माण झाली वगैरे शब्दप्रयोग करीतच राहतो. राष्ट्राध्यक्ष गिरी गेले तेव्हा सर्वांनी सढळपणे हा शब्द वापरला. पुण्यात नुकतेच ग. वि. केतकर गेले तेव्हाही या शब्दाचा प्रयोग झालाच. एकीकडे डॉ. मंडलीक याच्यासारखे वृद्ध 'दयामृत्यू' कल्पनेचा पुरस्कार करणारे लेख लिहीत आहेत, टी. व्ही. वर तेंडुलकरांसारखे नाटककार त्यांची मुलाखत घेऊन या कल्पनेचा ऊहापोह करीत आहेत, तर आपण मात्र अजून जुनेच शब्दप्रयोग व त्यामागील भावना प्रकट करण्याची आपली पूर्वापारची सवय सोडायला तयार नाही. कुणाला असे वाटले की, आपले हातपाय थकले, आपली इंद्रिये आता कामातून गेली, आपले जगणे स्वतःला आणि इतरांनाही आता केवळ भारभूत आहे, त्रासदायकही आहे, तर त्याला आपले जीवन संपवण्याचा कायदेशीर व सुलभ मार्ग उपलब्ध हवा. गर्भपात कायदेशीर करणाऱ्या आपल्या बुद्धिवादी व निधर्मी समाजाने तरी यात क्रूरपणा आहे, जीवहत्या आहे, असे म्हणू नये. गाय ही जर एक उपयुक्त पशू ठरू शकते तर माणसाने स्वत.कडेही तसे त्रयस्थ वृत्तीने पाहायला काय हरकत आहे? गाय किंवा एखादा माणसाला साथ देणारा प्राणी गरज संपल्यावर मारून टाकावा असे म्हटले तर माणसालाही गरज सपल्यावर जगवत ठेवण्यामागचे कारण काय आहे? गायीला जगण्याचा अधिकार नसेल तर माणसालाही तो कुणी दिला? जीवन ही एक पवित्र धारणा किंवा वस्तू आहे, सहसा तिचा नाश करू नये, हा विचार धार्मिक संस्कारातून जन्मास येतो. ज्याचा उलगडा तर्कबुद्धीने करता येत नाही अशा एखाद्या सर्वंकष, पवित्र अस्तित्वावर श्रद्धा ठेवल्याशिवाय मानवी जीवनालाही पवित्रता लाभू शकत नाही आणि पवित्रता नसेल तर वाटेल ती किंमत मोजून ते जगवले पाहिजे, हा तरी आग्रह कसा धरता येईल? एकीकडे हा सर्वात्मक पवित्रताभाव व दुसरीकडे अस्तित्व टिकवून धरण्यासाठी करावा लागणारा किमान जीवनसंघर्ष, ही दोन टोके साभाळता साभाळता धार्मिक वृत्तीच्या मानवासही काही तडजोडी कराव्याच लागतात. तरी पण त्या कमीत कमी हिंसायुक्त असतील असे तो पाहतो; सृष्टीशी, आपल्या सभोतालच्या निसर्गाशी, इतर माणसाशी, पशुपक्ष्याशी जास्तीत जास्त जमवून घेऊन आपला वैयक्तिक व सामाजिक चरितार्थ चालवण्याचा त्याचा प्रयत्न असतो. सापाला तो मारतो; पण जिने आपली शेतीभाती नागरली, आपल्याला अन्नपाणी दिले, त्या गायीला तो शक्यतो वाचवू पाहतो. उलट गायीला मारून खाण्यात जणू पुरुषार्थ आहे अशा दुसऱ्या टोकाला बुद्धिवादी गेलेला असतो. अशा दुसऱ्या टोकाचा आग्रह धरणाऱ्यांनी तरी स्वाभाविक, नैसर्गिकरीत्या एखाद्याचा मृत्यू झाल्यावर, उगाच 'पोकळी निर्माण झाली' वगैरे जुनेच शब्द वापरणे सोडून दिले पाहिजे व आनंद नाही तरी निदान समाधान व्यक्त करण्याची धिटाई दाखवली पाहिजे. अशा अवस्थेला पोचलेल्याचे निधन 'दुःखद' तरी का मानायचे? कामू जसा Outsider या कादंबरीत आपल्या आईच्या मृत्यूकडे तिऱ्हाईत कोरडेपणाने पहातो तसे पाहण्याची निदान बुद्धिवादी मंडळींनी तरी तयारी ठेवली पाहिजे. पिकलेले फळ झाडावरून पडले तर कुणी खेद, दु.ख मानीत नाही. एक निसर्गक्रमानुसार घडलेली घटना म्हणून या पडलेल्या फळाकडे पाहिले जाते. तसेच स्वाभाविक व नैसर्गिक मृत्यूकडेही पाहिले जावे. एक घटना म्हणून ही नोंद व्हावी. हवे कशाला सगळे दुःखभावनेचे प्रदर्शन? शिवाय हे प्रदर्शन खरे किती, खोटे किती हा प्रश्न वेगळाच!

¤

केतकराच्या बाबतीत काय घडले पहा. मागाहून श्रद्धांजली-लेख कितीका येईनात; पण शेवटी शेवटी ते एकाकीच होते नं? केसरी-संस्था, तरुण भारत, गीताधर्ममंडळ वगैरे सस्थाची त्यानी सेवा बजावली. अनेक सार्वजनिक कार्ये त्यांनी नि.स्वार्थपणे, निष्ठापूर्वक पार पडली, तरी पण शेवट एकाकी अवस्थेत–पूना गेस्ट हाउसमध्ये–यावा, हे विचित्रच नाही का? वृत्तपत्रातून फुटकळ लिखाण करून वरकड खर्च भागवण्याची शेवटीशेवटी त्याच्यावर पाळी आली, असे ते गेल्यावर म्हटले-लिहिले गेले आणि श्रद्धाजली लेख वाचावेत तर सगळीकडे त्यांच्या धारदार आणि बेडर वृत्तीने लिहिलेल्या अग्रलेखाची स्तुतीच स्तुती! तसाच तो दादू इंदुरीकराचा मृत्यू. लाखो मराठी रसिकाची हृदये आपल्या कलेने जिंकणारा, दिल्लीपासून गल्लीपर्यंत आपले 'गाढवाचे लग्न' वाजतगाजत मिरवणारा हा महाराष्ट्राचा 'वगसम्राट' शेवटी लोणावळ्याला एका पारशाच्या घरचे बागकाम करून, त्याची कुत्री सांभाळून कशीबशी आपली दुपारची वेळ भागवत होता! जगणे हे इतके क्लेशदायक आणि मानहानिकारक झाले असेल तर मृत्यू हा अशापैका कित्येकाना वरदानच वाटण्याचा संभव अधिक! निदान अशाना तरी ह्या मृत्यूचा सुलभ व कायदेशीर पर्याय का उपलब्ध असू नये? अशाना स्वाभाविक मृत्यू आल्यावर आपण तो 'दु खद' वगैरे का जुन्या प्रथेप्रमाणे म्हणत राहावे? उलट आपण प्रामाणिक असू, सुसंगतीचा आपला आग्रह असेल तर आपण श्रद्धाजली कार्यक्रमाऐवजी मृत्यूच्या आभारप्रदर्शनाचाच एखादा कार्यक्रम आयोजित करायला हवा.

तोही आपली कार्यक्रमांची हौस असते म्हणून. कामूच्या Outsider —ला अर्थात हेही शोभून दिसत नाही, हेही उघडच आहे.

◻

बुद्धिवादाने थोडे आणखीही पुढे जायला हरकत नाही. हवा असलेल्याना दयामृत्यू सुलभ व कायदेशीर करणे ही अगदी प्राथमिक पायरी झाली. मृत्यू नको असला तरी अशांची उपयुक्तता संपलेली असेल तर त्यांचा जगण्याचा हक्क हिरावून घेण्यास तरी काय हरकत आहे? गायीना जर अनुपयुक्त झाल्यावर मारायचे तर माणसानाही हा न्याय लागू करण्यात काय चूक आहे? असेल गायीपेक्षा मानव हा अधिक उत्क्रांत किंवा प्रगत असा निसर्गाचा आविष्कार! पण त्यामुळे मानवी जीवन संपवू नये, जे बळी आहेत त्यानी निर्बलाना मारून आपली जगण्याची शक्ती वाढवू नये, असे कसे काय म्हणता येईल? माणसाला विनाकारण मारू नये हा दंडक मानवी जीवनाला आपण काही पवित्रतेची उंच जागा देत असू तरच समर्थनीय ठरतो. वैज्ञानिक किंवा बुद्धिवादी दृष्टिकोनातून विचार करता अशी पवित्रता मानवी जीवनाला बहाल करण्याला कुठलाच शास्त्रीय आधार नाही. बर्ट्रंड रसेल तर आधुनिक बुद्धिवाद्याचा महामेरू. पण तोही आपल्या अखेर–अखेरच्या लिखाणात अशी पवित्रता लाभल्याशिवाय मानवी जीवनाची उन्नतावस्था टिकू शकणार नाही असे म्हणत होता. पण ही पवित्रता येते कशी, आणते कोण या प्रश्नाचे उत्तर त्याच्याजवळही नव्हतेच. निर्गुण, निराकार पण शुभंकारी अशा एखाद्या परम अस्तित्वावर श्रद्धा ठेवून आइन्स्टाइनसारखे शास्त्रज्ञ आपल्यापुरता हा संघर्ष, हे द्वैत मिटवून टाकीत होते; पण रसेल शेवटपर्यंत गोंधळलेला संशयात्माच राहिला. त्याला 'A philosopher without a philosophy' म्हटले गेले. यातील कुणाची वैज्ञानिकता, बुद्धिवाद खरा व शास्त्रीय मानायचा? आइन्स्टाइनचा की रसेलचा? रसेल आपल्याकडील बुद्धिवाद्यांना सध्या अधिक जवळचा वाटत असावा. अशानी तरी मानवी अस्तित्वाचे स्तोम फारसे माजवायचे कारण नाही. निरुपयोगी मानवांना सक्तीने जीवनाधिकारापासून वंचित करण्यास त्यांनी हरकत घेऊ नये; शिवाय आपल्याकडील लोकसंख्येचा प्रश्न सुटायला तर त्यामुळे किती तरी मदत होणार आहे! गर्भपात आपण कायदेशीर केला. कुटुंबनियोजन आपण सक्तीचे करू मागतो. मग मृत्यूबाबत तरी एवढा हळवेपणा कशासाठी? जसे निवृत्तीचे वय आहे तसेच जगण्याचेही वय ठरवावे. त्यानंतर काही काळ दयामृत्यूचा पर्याय ठेवावा. (दयामृत्यूऐवजी स्वेच्छामृत्यू म्हटले जावे. कारण 'दया' या शब्दालाच बुद्धिवादी हरकत घेतील.) आयुष्याच्या सुरुवातीला नोकरीत प्रोबेशनवर काही काळ काढावा लागतो, तसेच हे मुक्तिपूर्व प्रोवेशन समजण्यात यावे. त्यानंतर सक्तीचा काल सुरू व्हावा. व्हिसा पासपोर्टची मुदत संपल्यावर जसा तो देश सोडून जावेच लागते, तसे माणसाने पृथ्वी ही विशिष्ट मुदत संपल्यावर सोडून जायची तयारी ठेवायला हवी; पण सध्या पहावे तो नवीन नवीन औषधांचा मारा करून, शरीरात सुया आणि नळया खुपसून खुपसून तो निकामी आणि निरुपयोगी झालेला गलितगात्र देह जगवण्याचा आटापीटा! हेही जर विज्ञानच तर मग त्या गरीब गाईवरच का रे बाबानो, तुमचा सगळयांचा डोळा? तिलाही जगायचे तितक्या दिवस जगू द्या, नाही तर आपल्यातल्या निकाम्यांना तरी निरोप देण्याची तयारी ठेवा! दोन्ही बाजूनी भाकरी कशी खाता? सावरकरानी गाय ही उपयुक्त पशू आहे असे मत मांडले आणि स्वतःची शारीरिक उपयुक्तता संपल्याची खात्री पटल्यावर स्वतःचे आयुष्य स्वतःच संपवून टाकले! त्याला आत्मार्पण म्हणा की आत्महत्या म्हणा. त्यांनी आपल्या लिहिण्यात आणि वागण्यात निदान विसंगती तरी ठेवली नाही. गाय हा एक उपयुक्त पशू आहे एवढाच सावरकरमताचा पूर्वार्ध स्वीकारून आपण बुद्धिवादी, सुधारक वगैरे आहोत असे दाखवणे फारच सोपे आणि उथळपणाचे आहे. निरुपयोगी झाल्यावर स्वतः दूर होणे तर लांबची गोष्ट आहे; पण निरुपयोगी जीवन, मग ते मानवी असो की पशुपक्ष्यांदिकाचे असो, सक्तीने दूर करायला हरकत नाही; एवढे मत तरी आमचे विज्ञानवादी म्हणवणारे सुधारक–मित्र धाडसाने मांडतील का? यातील बरेचजण डॉक्टरी व्यवसायातले आहेत आणि डॉक्टरांनी तर रोग्याचे प्राण अखेरपर्यंत वाचवण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा केलीच पाहिजे, असा या व्यवसायाचा मूळ दंडकच आहे. या दंडकाला शास्त्रीय आधार नाही. (या दंडकाचे मूळ ख्रिश्चन धर्मश्रद्धेत आहे!) तरी तो पाळला जातो, मानवी जीवन अखेरच्या क्षणापर्यंत जगवण्याची धडपड–ती अशास्त्रीय असली तरी–केली जाते आणि मग फावल्या वेळचा उद्योग म्हणून भविष्यावर हल्ला चढवण्यासारखे निरुपद्रवी कार्यक्रम बुद्धिवादी सुधारक म्हणवणाऱ्या मंडळीकडून हाती घेतले जातात. भविष्य वाचल्यामुळे होणाऱ्या विज्ञानहानीपेक्षा दारूच्या सेवनाने होणारी हानी, विशेषतः आपल्यासारख्या गरीब देशात, किती तरी पटीनी अधिक आहे. कोट्यावधींचे

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. ग. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

संसार या सवयीमुळे, व्यसनामुळे आज रोज उध्वस्त होत आहेत. वर्तमानपत्रातले भविष्य वाचले किंवा पत्रिका दाखवून भविष्य ऐकले तर होणाऱ्या नुकसानीची, या दारूमुळे होणाऱ्या नुकसानीशी तुलनासुद्धा करू नये, इतके दारूमुळे होणारे नुकसान प्रचंड आहे. दारूपानाला कसलाही शास्त्रीय आधार नाही; पण प्रतिष्ठा मात्र भरपूर आहे, ती वाढतेच आहे; पण दारुबंदीविरुद्ध आवाज आमची सुधारक बुद्धिवादी मित्रमंडळी उठवणार नाहीत. कारण यामधील बहुतेकांची संध्याकाळ दारूशिवाय व्यतीत होत नसते. भविष्यामुळे प्रयत्नवादाला खीळ बसत असेल तर दारूमुळे काय जास्त कष्ट करायला माणसे लायक ठरत असतात काय? तसाच तो बुवाबाजीवरचा हल्ला. एखाद्या बुवाचा भ्रष्टाचार वेशीवर टांगणे वेगळे आणि धर्मश्रद्धेवरच हल्ला चढवणे वेगळे! ही गल्लत आमच्या सुधारक बुद्धिवादी मित्रमंडळीकडून नेहमीच केली जाते आणि बुमरँग मग हमखास उलटते. अगदी जातीभेदाबद्दलही ही गल्लत पूर्वीपासून होत आलेली आहे. विवेकानंदानी शिकागोहून लिहिलेल्या (दि. २ नोव्हें. १८९३) आपल्या एका पत्रात म्हटले आहे– 'भारतातील साऱ्या समाजसुधारकांनी जर कोणती भयंकर चूक केली असेल तर ती ही की, त्यांनी पुरोहिताच्या अघोरीपणासाठी व सामाजिक अवनतीसाठी धर्माला जबाबदार ठरविले आणि हिंदुधर्मरूपी अभेद्य किल्ल्यावर हल्ला चढवून तो उध्वस्त करून टाकण्याचा त्यांनी चंग बांधला आणि याचा परिणाम काय झाला? हाच की त्यांना अपयश आले! बुद्धदेवांपासून तो राममोहन रॉय यांच्यापर्यंत सर्वांनी जातिभेदाला धर्माचे अंग मानण्याची घोडचूक केली आणि जातिभेदाबरोबर धर्मावरही आघात केला. व्हावयाचे तेच झाले. त्याना अपयश आले. या बाबतीत पुरोहितलोक काही बडबडोत, पण जातिभेद म्हणजे केवळ एक दृढमूल झालेली सामाजिक संस्थाच होय. तिचे कार्य आता संपले आहे. आता ही जातिसंस्था भारताचे वातावरण जणू दुर्गंधाने भरून टाकीत आहे. लोकांची नष्ट झालेली सामाजिक स्वत्वबुद्धी पुन्हा जागृत करूनच हा जातिभेद दूर करता येईल.' शिवाय वाढत चाललेल्या 'सेक्युलर' बुवाबाजीचे काय करायचे हा प्रश्न आहेच.

पंढरपूरच्या सरकारी पूजेला विरोध करणे हा सुधारक–बुद्धिवादी मंडळीच्या कार्यक्रमपत्रिकेवरचा आणखी एक आवडता विषय. पाच पाच लाख यात्रेकरू जेथे पावसापाण्यात जमतात त्या बहुजन समाजाला प्रिय असलेल्या दैवतासमोर एखादा मंत्री वाकला, त्याने षोडशोपचारे या दैवताची पूजा केली, तर असे काय आकाश कोसळते? अगदी घटनेवर बोट ठेवायचे म्हटले तरी आपल्या सेक्युलॅरिझमचा अर्थ धर्मविरोध, निधर्मीपणा असा होत नाही. घटनाकारांपैकी कुणी तसा तो केलेला नाही. शिवाय जी प्रथा, धर्मश्रद्धा नव्या काळात अडचणीची नाही, प्रगतीला जी फारसा अडथळा उत्पन्न करीत नाही ती चालू राहण्यात फारसे गैर तरी काय आहे? उलट वर विवेकानंदानी म्हटल्याप्रमाणे सामाजिक स्वत्वबुद्धी वाढवण्यासाठी अशा प्रथाचा, श्रद्धांचा उपयोग करून घेण्याची विधायक दृष्टी आपण बाळगली पाहिजे व खरोखरच ज्या चालीरीती, प्रथा, अंधश्रद्धा समाजाला घातक ठरत आहेत त्यांच्या उच्चाटनावर लक्ष केन्द्रित केले पाहिजे. नुकताच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यानीही पंढरपूरच्या सरकारी पूजेला त्यांचा असलेला विरोध जाहीरपणे नोंदवला आहे. दारूपायी होणारी लाखो कुटुंबाची धूळदाण त्यांना दिसली नाही. प्रत्येक सिगरेट-पाकिटावर लिहिलेली 'धूम्रपान हे अपायकारक आहे' ही ओळ त्याना दृष्टिआड करावीशी वाटली. यामुळे या गरीब देशाच्या संपत्तीचा होणारा धूर अधिक चिंताजनक की वर्षातून एकदा एखाद्या मंत्र्याने केलेली विठ्ठलाची पूजा? शिवाय तर्कतीर्थांच्या बाबतीत तर एक आणखी विसंगती आहे सोमनाथच्या प्राणप्रतिष्ठा–सोहोळयाचे पौरोहित्य त्यानी मग कशासाठी केले? पहिल्यापासून अशा विसंगतीनी सुधारणेच्या चळवळीला मार बसत आलेला आहे. ती लोकांच्या टिंगलटवाळीचा विषय झाली त्याला सुधारक म्हणवणाऱ्याच्या विचारातील व कृतीतील विसंगती, तफावत हे एक प्रमुख कारण आहे. आगरकर, सावरकर हे दोनच अपवाद दिसतात. बाकी सगळा फावल्या वेळचा कारभार! त्यामुळे आगरकराच्या प्रमुख सुधारणा समाजाने, थोडया वेळाने का होईना, आत्मसात केलेल्या दिसतील. विधवा–पुनर्विवाह ही त्या काळची खरोखरच एक आवश्यक सुधारणा होती. आज ती मान्य झालेली आहे व तिचे श्रेयही आगरकरांना मोकळेपणे दिले जात आहे. ही सुधारणा त्या वेळच्या मूठभर ब्राह्मणसमाजापुरती होती, बहुसंख्य समाजात पुनर्विवाहाची चाल त्याही वेळी होती, आजही आहे, हे खरे असले तरी आगरकराचे याबाबतीतील श्रेय कुणीही नाकारताना दिसत नाही. असे खरोखरीचे प्रश्न बुद्धिवादी सुधारक म्हणवणाऱ्यांनी निवडले पाहिजेत, वागण्या बोलण्यातल्या विसंगती कमीत-कमी ठेवायचा प्रयत्न केला पाहिजे, तरच आज मागे पडत चाललेली ही चळवळ पुन्हा जोर धरेल. दर पिढीला नव्या 'अंधश्रद्धा,' नवे बुवाबाजीचे प्रकार, नव्या गैरसमजुती याचो काजळी वाढतच असते. ती दूर करण्यासाठी आगरकर–सावरकर, शिंदे–आंबेडकर हवेच असतात; पण याचा अर्थ आंबेडकरांनी मनुस्मृती जाळली म्हणून आपणही ती जाळावी असा नाही. आबेडकराचे तेव्हाचे ते करणे स्वाभाविक होते, मनुस्मृतीने त्यांना व ते ज्या समाजाचे नेतृत्व करीत होते त्याला खरोखरच शतकानुशतकांच्या गुलामगिरीत बांधून टाकलेले होते. त्यांचा संताप त्यामुळे समजण्यासारखा आहे. पण आमच्या अ. भि. शहानी, पन्नास वर्षानंतर, तेच करावे ही शुद्ध भंपकबाजी आहे! असला काही उसना आव मंडळी दाखवतात आणि सगळया बुद्धिवादाची, सुधारणेच्या चळवळीचीच मग समाजाकडून उपेक्षा टिंगलटवाळी होते. यापेक्षा डॉ. मंडलीक किती तरी बरे. त्यानी चालू संदर्भ असलेला एक विषय निवडला व बुद्धिवादी दृष्टिकोनातून त्यावर मतप्रदर्शन सुरू केले. मृत्यू अटळ आहे. मग तो स्वतःला व इतरांना कमी त्रासदायक कसा ठरेल हे पाहणे, यात मनुस्मृती जाळण्यापेक्षा किंवा भविष्यावर हल्ले चढवण्यापेक्षा निश्चितच अधिक बुद्धिवाद आहे. केतकरासारखे, दादू इंदुरीकरांसारखे लोक जाणारच; पण त्यानी अधिक चांगल्या प्रकारे जायला हवे, हेही खरे नाही का? असे काही लोकाना जिव्हाळयाचे वाटणारे, त्यांच्या अंतःकरणाची कालवाकालव करणारे प्रश्न बुद्धिवाद्यानी निवडले पाहिजेत, त्यावर सारासार विचाराने योग्य उत्तरे शोधून लोकांसमोर ठेवली पाहिजेत, तरच बुद्धिवादाचे पाऊल हळूहळू पुढे पडेल, ते पडायलाही हवे. नाही तर खोमेनी आहेतच दबा धरून बसलेले... सगळयाच धर्मातले. सामाजिक स्वत्वबुद्धी जागृत करून सुधारणा आणि बुद्धिवाद पुढे जाणार नसला तर दुसरे काय असू शकणार? □

# युवाशक्ती

## अपेक्षित प्रभाव का नाही ?

वा. दा. रानडे

भारतातील युवाशक्ती' (यूथपॉवर इन इंडिया) या विषयावर राजमोहन गांधी, सौगत राय आणि प्रियरंजन दास मुन्शी यांचे लेख '.स्टेटस्मन' दैनिकाच्या २२, २३ व २४ जुलैच्या अंकात प्रसिद्ध झाले आहेत. संजय गांधीच्या निधनानंतर इंदिरा युवक कॉंग्रेसचे भवितव्य काय या प्रश्नाच्या अनुषंगाने या विषयाची चर्चा या तिघानी केली असली तरी भारतीय राजकारणावर युवक-शक्तीचा विशेष प्रभाव का पडत नाही याचा विचार त्यानी केला आहे. सौगत राय आणि प्रियरंजनदास मुन्शी दोघेही अर्स कॉंग्रेसचे. एकाच पक्षाच्या दोघांचे लेख घेण्यापेक्षा इंदिरा कॉंग्रेस, दोन्ही कम्युनिस्ट पक्ष, समाजवादी यांचे लेख घेतले असते तर विविध दृष्टिकोण त्यातून व्यक्त झाले असते हा प्रश्न सर्वच राजकीय पक्षाच्या व एकंदर युवक चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

आपल्या राजकारणात युवकाचा सहभाग व प्रभाव वाढला पाहिजे; त्याना अधिक प्रमाणात प्रतिनिधित्व मिळायला पाहिजे या मतास सत्तेच्या खुर्चीला टिकून राहणाऱ्या वृद्ध नेतृत्वाशिवाय कोणी विरोध करील असे वाटत नाही. वृद्ध नेते सुद्धा उघड विरोध करीत नाहीत. तरुण नेत्यांना अनुभव नसतो. काही वर्षे वृद्धाच्या अनुभवी नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली काम करून त्यानी अनुभव घेतला पाहिजे असे ते म्हणतात; पण वस्तुतः त्यांना आपले अधिकारपद सोडायचे नसते. सरकारी व खासगी नोकऱ्यांत अठ्ठावन्न ते साठाव्या वर्षी निवृत्ती असते तोच नियम राजकीय नेत्यांनीही स्वत:च्या बाबतीत लागू करायला हवा; साठाव्या वर्षानंतरही त्यांनी कार्य जरूर करावे, आपल्या अनुभवाच्या मार्गदर्शनाचा लाभ तरुण पिढीला द्यावा; पण अधिकारपद स्वीकारू नये. इंग्लंडमध्ये माजी पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन यांनी हा संकेत कटाक्षाने पाळला. आपल्याकडे नानाजी जोशींनी ही सूचना केली होती; पण ते केवळ परोपदेशे पांडित्य नव्हते. साठाव्या वर्षी ते पक्षातील अधिकारपदावरून निवृत्त झाले; पण बाह्यतः कितीही-निरिच्छा दर्शविली तरी बहुसंख्य राजकीय नेत्यांना सत्तेचा व अधिकारपदाचा मोह आवरत नाही. रशिया-चीनसारख्या कम्युनिस्ट देशांतील नेतृत्वसुद्धा याला अपवाद नाही. वृद्ध नेते स्वेच्छेने निवृत्ती पत्करायला तयार नसतील तर तरुणच संघटित होऊन त्यांना तसे करायला भाग पाडतील. हा काळ आता फार दूर नाही हे वृद्धनेतृत्वानेही ओळखायला हवे.

निरनिराळ्या राजकीय पक्षाच्या युवक संघटना आहेत. त्या पक्षाच्या भूमिकेचा प्रचार करणे हेच त्यांचे मुख्यतः काम. धोरण ठरविण्यात युवकांचा सहभाग फार थोडा असतो. पक्षाच्या प्रचारासाठीच मुख्यत: युवकसंघटना राबविल्या जातात. युवक संघटनांनी केवळ प्रचारकाची भूमिका न बजावता पक्षाची भूमिका, धोरण, कार्यक्रम ठरविण्यात परिणामकारक सहभाग घेतला पाहिजे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात हे होण्याची आवश्यकता आहे; पण सत्तेशी निगडित असल्याने सर्व क्षेत्रावर प्रभाव पाडणारे क्षेत्र म्हणून राजकारणात त्याची विशेष आवश्यकता आहे.

तरुण नेतृत्व तयार झाले पाहिजे, त्याला वाव दिला पाहिजे याची महात्मा गांधीना जाणीव होती. पंडित जवाहरलाल नेहरूंची कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी चाळिसाव्या वर्षी निवड झाली तेव्हा त्यांनी लिहिले होते, 'वृद्धांचा डाव पुरा झाला आहे. भविष्याची लढाई आता तरुण स्त्री-पुरुषांना लढायची आहे.' कॉंग्रेसचा अध्यक्ष हा काही एकतंत्री सुलतान नव्हे. ब्रिटिश राजा आपली मते लोकावर लादू शकत नाही तसेच कॉंग्रेस अध्यक्षाच्या बाबतीत आहे. जवाहरलाल आपल्या भोवतालच्या वातावरणाच्या फार पुढे जाऊन विचार करतात यात शंका नाही; पण फुटेपर्यंत ताणावयाचे नाही या मर्यादेत आपला वेग ठेवण्याइतके ते नम्र व व्यवहारी आहेत. युवकाची ही कसोटीची वेळ आहे. वाफ बंद जागेत साठविली जाऊन नंतर ठराविक प्रमाणात ती बाहेर सोडली जाते तेव्हाच तिच्यात मोठी शक्ती येऊन ती प्रचंड वेग निर्माण करते. त्याप्रमाणे तरुणानी स्वेच्छेनेच आपल्या शक्तीचा संचय करून व नियत्रण करून आवश्यक त्या प्रमाणातच तिचा वापर केला पाहिजे.'

युवा-शक्तीचे महत्त्व गांधीजी मानतात. तिला वाव दिला पाहिजे हेही ते मान्य करतात; पण वाफेच्या शक्तीशी तिची तुलना करून तिच्यावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकताही त्यानी प्रतिपादिली आहे आणि नेमके याच गोष्टीकडे आज दुर्लक्ष होत आहे. इंदिरा युवक कॉंग्रेसचे बाबतीत ते विशेष जाणवते. संजय गांधीच्या निधनानंतर युवक कॉंग्रेसचे भवितव्य काय हा प्रश्न चर्चिला जात आहे. संजय गांधीच्या प्रभावामुळे इंदिरा कॉंग्रेस उमेदवारनिवडीत युवकांना या वेळी जास्त जागा मिळाल्या, ते निवडूनही आले; पण हा गट निश्चित तत्त्वप्रणाली, धोरण, कार्यक्रम घेऊन काम करणार आहे का ? इंदिरा कॉंग्रेसवर त्याचा प्रभाव पडून तिचे सध्याचे स्वरूप त्यामुळे कितपत बदलण्याचा संभव आहे हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. संजय गांधीच्या नेतृत्वाखाली जी युवक कॉंग्रेस संघटित झाली तिच्यामागे ठाम विचारप्रणाली नाही. जी काही मते संजयने मांडली तीच युवक कॉंग्रेसची मते मानली तर ती उजवीकडे झुकणारी, खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारी आणि समाजवादविरोधी आहेत. 'सूर्य'मध्ये संजयची शेवटची मुलाखत प्रसिद्ध झाली. वार्ताहराने प्रश्न विचारला होता, 'सध्याच्या संसदेत तरुण सभासदाची संख्या मोठी आहे. देशाचे भवितव्य घडविण्यात ते कोणती भूमिका पार पाडू शकतील असे तुम्हाला वाटते ?' संजयने उत्तर दिले, 'संसदेत विरोधी पक्षाने १९७२ ते ७५ या काळात प्रत्येक टप्प्याला सरकारी कामकाज रोखण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला आणि ज्योतिर्मय बसूसारख्या तीन-चार सभासदानी तर गृहाला आपले कामच करू दिले नाही आता संसदेचे तरुण सभासद त्या उपद्रवकारी गटाला त्यांच्याच औषधाची चव दाखवीत आहेत. त्यामुळे संसदेचे काम पूर्वीपेक्षा अधिक सुरळीतपणे व शांतपणे चालू आहे. तरुण सभासदांचा गट अधिक बोलका आहे. कोणाच्या दबावापुढे तो मान तुकविणार नाही.' देशापुढे हाच

महत्त्वाचा प्रश्न आहे का ? बेकारी, दारिद्र्य, वाढती लोकसंख्या, झोपडपट्ट्या, बेशिस्त याबाबत हा गट काय करणार याचा उल्लेखही त्यात नव्हता.

युवक कॉंग्रेसवर टीका करताना आमच्या संघटना चांगल्या काम करीत आहेत असा दावा इतर पक्षाच्या युवकसघटना तरी करू शकतील काय ? ज्या पक्षांशी या संघटना निगडित आहेत त्यांच्या धोरणावर, कार्यक्रमावर प्रभाव पाडण्यात त्यानाही यश आले आहे असे म्हणता येणार नाही. जयप्रकाशांच्या संपूर्ण क्रांतीचे उद्दिष्टानुसार कार्य करण्यासाठी छात्रसंघर्षवाहिनी स्थापन झाली; पण तिचे कार्यही समाधानकारकपणे चालू नाही. १९७७ च्या निवडणुकीत वाहिनीतर्फे काही प्रतिनिधी बिहार विधानसभेवर निवडून गेले होते; पण त्याची कामगिरी समाधानकारक नव्हती. समाजपरिवर्तनाचे कार्य सेवादलाकडून फारसे परिणामकारकपणे होत नाही असे असमाधान व्यक्त करण्यात येत आहे. या कार्यासाठी नवी सघटना काढण्याचे प्रश्नावर कार्यकर्त्यांत वाद निर्माण झाला आहे. समाजपरिवर्तनाचे कार्य वास्तविक पक्षनिरपेक्षपणे चालायला हवे. अशा व्यापक कार्यासाठी युवाशक्तीचा उपयोग केला जावा हा व्यापक दृष्टिकोन आमच्या राजकीय पक्षाचे नेत्याजवळ नाही. युवकसंघटनांना आपल्या पक्षाच्या दावणीस बांधण्याचा त्यांनी आतापर्यंत प्रयत्न केला. आपल्या पक्षाची रंगरूट भरतीकेंद्रे या उद्देशानेच या संघटनाचा विचार झाला. त्यामुळेच युवाशक्ती देशाच्या राजकारणावर आपला ठसा पाडू शकली नाही. आता तरी चित्र बदलायला हवे. □

---

# दलित चळवळ इस्लामच्या दिशेने....

कर्नाटकमधील दलितांनी अखेर एक जोरदार धक्का दिला आहे.

माजी खासदार व आमदार सहभागी झालेल्या एका परिसंवादात एकमताने ठराव संमत करून दलितांनी 'स्वाभिमान प्राप्त करून घेण्यासाठी हिंदुधर्म सोडण्याशिवाय पर्याय उरलेला नाही' अशी घोषणा केली आहे.

परिवर्तन विषयावर आयोजित करण्यात आलेल्या या परिसंवादात हिंदुधर्म सोडल्यानंतरची निवड व्यक्तीवर वा संघटनांवर सोडण्यात आली आहे.

'सिद्धार्थ एज्युकेशन सोसायटी' या परिवर्तनाची सर्व सूत्रे संभाळणार आहे.

गेली २० वर्षे लोकसभेचे सदस्य असलेले एस. एन. सिद्दय्या या परिसवादाच्या अध्यक्षस्थानी होते.

दिल्लीच्या बोर्ड ऑफ इस्लामिक पब्लिकेशन्सतर्फे प्रकाशित होणाऱ्या 'रेडियन्स' या नियतकालिकाच्या जूनच्या अंकातील लेखावरचे हे संकलित टाचण आहे–

चर्चेसाठी आणि विचारमंथनासाठी–

बंगलोरमधील एका परिसंवादात हिंदुधर्म सोडण्याविषयी दलितांनी संमत केलेला प्रस्ताव ही दलित चळवळीतील सर्वांत खळबळजनक घटना म्हटली पाहिजे. या ठरावातून व्यक्त झालेला धोका आणि परिवर्तनातून निर्माण होणारे दूरगामी परिणाम ध्यानात घेऊनच बहुधा स्थानिक वर्तमानपत्रांनी या परिसंवादाला प्रसिद्धी दिली नाही.

परिसंवादात नव्या धर्मनिवडीविषयी कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली नाही. सध्याच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय रचनेविषयी दलितांच्या मनात असलेल्या नाराजीमुळेच बहुधा एकाही वक्त्याने हिंदुधर्माशी सलग्न रहाण्याचा विचार बोलून दाखवला नसावा. पशूनाही अस्पृश्यापेक्षा बरी वागणूक दिली जाते, कुणालाही सन्मानाने वागू दिले जात नाही हेच या परिसवादातून वारवार मांडण्यात आले.

लोकप्रतिनिधित्वासाठी असलेल्या राखीव जागा, शिक्षणसंस्थांमधून प्रवेशासाठी असणाऱ्या राखीव जागा आणि नोकऱ्यामध्ये ठेवण्यात आलेले राखीव जागांचे प्रमाण अस्पृश्यांचा कोणताही भौतिक प्रश्न सोडवू शकलेले नाही, यावर सर्व वक्त्यांनी भर दिला. सामाजिक शोषणातून मुक्त होण्याची त्यांची गरज आर्थिक व राजकीय स्थिती सुधारण्यास कारणीभूत असणारा राखीव जागांचा प्रश्न कधीच सोडवू शकलेला नाही. आर्थिक शोषण हे सामाजिक शोषणाचेच एक अंग असले तरीही आर्थिक वा राजकीय बदलाद्वारे सामाजिक परिवर्तन होऊ शकतेच असे नाही.

हिंदुधर्मातील जातिव्यवस्था व अस्पृश्यतेमुळेच या समाजाचे अधःपतन झाले अशी कारणमीमांसा करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० वर्षांपूर्वी हिंदुधर्म सोडला होता. भारतीय समाजजीवनावर डॉ. आंबेडकरांइतकी अधिकारवाणीने बोलणारी व्यक्ती हे

विचार मांडीत असताना हिंदुधर्म सोडण्यावाचून दुसरा पर्याय शिल्लक असेल असे वाटत नाही.

बाबासाहेबानी हिंदुधर्माचा त्याग करून बुद्धधर्माचा स्वीकार केलेला असला तरी त्यातूनही फारसा बदल घडू शकलेला नाही, असाही विचार अनेक वक्त्यानी मांडला. हिंदुधर्म नष्ट करण्याची गोष्ट सोडूनच द्या, पण हिंदुधर्मावर आपली छाप पाडण्याचे कामही बौद्धधर्म करू शकला नाही आणि त्यामुळे परिसंवादातील बहुसंख्य वक्त्यानी ( ख्रिश्चन धर्माचा पर्याय सुचविणारे काही अपवाद वगळता ) अधिक आक्रमक, कट्टर मुस्लिम धर्माचा पुरस्कार केला. काही वक्त्यांनी कोणताच पर्याय सुचवलेला नसला तरीही हिंदुधर्म सोडण्याविषयी त्याचे एकमत असावे असे दिसले.

'हिंदुधर्मात राहू नये यावर सर्वच वक्त्यांचे एकमत झाले आहे ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. कर्नाटकातील दलित–लढ्याला मिळालेले हे एक महत्त्वाचे वळण आहे' असे उद्गार श्री. एस. एम. सिद्दय्या यानी अध्यक्षपदावरून बोलताना काढले. केंद्रीय शिक्षण-मंत्री श्री. शंकरानंद यांचाही या प्रस्तावाला पाठिंबा असल्याचा गौप्य स्फोट श्री. सिद्दय्या यानी या वेळी बोलताना केला.

'हिंदुधर्म सोडायचाच असेल तर नवा धर्म स्वीकारताना कृपा करून मुस्लिम वा ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याऐवजी बौद्धधर्माचा स्वीकार करा' अशी विनंती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मंडळींनी या परिसंवादाची बातमी कळताच आपल्याला केली होती असेही श्री. सिद्दय्या या वेळी बोलताना म्हणाले.

'हिंदु जातीयवाद्यांना बौद्धधर्माविषयी प्रेम एवढ्याचकरता आहे की हिंदुधर्माच्या गवगव्यात बौद्धधर्माची जाणीवही कुणाला होऊ शकत नाही आणि त्यामुळेच अधिक आक्रमक, माननीय अशा इस्लामधर्माची दलितांना अधिक आवश्यकता आहे' असे सांगून श्री. सिद्दय्या पुढे म्हणाले, 'अस्पृश्यतेचे सर्वाधिक प्रमाण असलेल्या म्हैसूर जिल्ह्यात आंबेडकर–संघ मोठ्या प्रमाणावर स्थापन होत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे, पण परिवर्तनाचे विषयात मात्र ही दलित मंडळी आंबेडकरांची शिकवणूक मानीत नाहीत ही दुःखाची गोष्ट आहे. अस्पृश्यसमाजातील सुशिक्षित तरुणांनी या कामी पुढाकार घेऊन राज्यभर परिवर्तनाची चळवळ चालवावी आणि बंगलोर-मध्ये तिचे राज्यव्यापी अधिवेशन आयोजित करावे.'

ख्रिश्चन धर्मप्रवेशाचे काही तुरळक प्रयोग चाललेले असले तरीही डॉ. आंबेडकरांच्या निधनानंतर परिवर्तनासाठी कोणतेही संघटित प्रयत्न झालेले नाहीत' असे मत पत्रकार व्ही. टी. राज-शेखर शेट्टी यांनी या परिसंवादात बोलताना काढले.

ते पुढे म्हणाले, 'रा. स्व. संघ, आर्यसमाज, रामकृष्णमिशन यासारख्या संस्था अस्पृश्यांच्या, आदिवासींच्या परिवर्तनाचे प्रयत्न रोखून धरत त्यांना हिंदु बनवीत आहेत. घटनेने धर्मपरिवर्तनाला परवानगी दिलेली असताना उच्चवर्णीय हिंदूंच्या वर्चस्वाखाली असलेले सरकार मात्र ख्रिश्चन मिशनऱ्यांना त्यांच्या परिवर्तनाचे कार्यात अडथळा उत्पन्न करीत आहेत. परिवर्तनामुळे हिंदुधर्माचा शक्तिपात होत असल्याचे मत संघवाल्यानी व्यक्त केले आहे. ख्रिश्चन धर्माशी वा अन्य धर्मांशी तुलना केल्यास एक प्रकारे हिंदु धर्माच्या उपयोग-हीनतेचीच ही ग्वाही नव्हे काय ?

भारतातील दारिद्र्यास आणि सामाजिक आर्थिक अधःपतनास हिंदुत्व कारणीभूत आहे असे ठाम मत डॉ. बाबासाहेबांनी व अन्य समाजशास्त्रज्ञानी अनेक वेळा व्यक्त केले आहे. हिंदुत्व आणि लोक-शाही एकत्र नांदू शकणार नाहीत. शतकानुशतके दलितानी सवर्णांच्या केलेल्या चाकरीतूनही सवर्णांचे हृदयपरिवर्तन होऊ शकलेले नाही. ज्याला हृदयच नाही त्याच्याकडून परिवर्तनाची अपेक्षा ठेवावीच कशाला ?

## पर्याय

'भारतीय संपत्तिविषयक व हक्कविषयक सर्व अधिकार परंपरेने सवर्ण हिंदूकडेच असल्याने ते अधिकार काढून घेण्यासाठी दलितांना सवर्णांच्या पकडीतून बाहेर यावे लागेल. एक तर अस्पृश्यांना हिंदू धर्मात राहून लाथा खात, प्राण कंठाशी आणत, बलात्कारासारखे अपमान सहन करीत जीवन कंठावे लागेल किंवा न्यायासाठी, सत्यासाठी सवर्णांचे विरोधात झगडावे लागेल. शोषकाच्या मूल्यरचनेचा एक भाग या नात्याने जीवन जगताना शोषित म्हणून जगण्याशिवाय त्याचेपुढे दुसरा कोणताही पर्याय उरलेला नाही. अस्पृश्यांना वाईट वागणूक देणाऱ्या हिंदुधर्मात दलित–बाधव राहणेच शक्य नाही. भारत देश टिकावयाला, मानाने उभा रहावयाचा असेल, तर हिंदुत्व नष्ट झाले पाहिजे.'

परिवर्तन करताना आपण कोणता धर्म पसंत कराल या प्रश्नाला उत्तर देताना शेट्टी म्हणाले, 'व्यक्तिशः मी मार्क्सवादी व नास्तिक असल्याने माझे बाबतीत प्रश्नच उद्भवत नाही. मानवनिर्मित समस्यांवर धर्म हा उपाय नव्हे, ही समस्या मानवानेच सोडवली पाहिजे. पेरियारने हे सिद्ध करून दाखवले होते, ज्या अस्पृश्यांना धार्मिक उत्तर हवे होते त्याना इस्लामचा मार्ग सुचवून त्याने हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला होता. इस्लाममध्ये मूर्तिपूजा नाही, कर्म-विपाकसिद्धांत नाही आणि धर्मगुरूचे थोतांडही नाही. तो संपूर्णपणे समाजवादी आहे. दुसऱ्या कुठल्याही धर्मापेक्षा या धर्मातील लोकांमध्ये धर्माभिमान आहे.'

२० वर्षांपूर्वीच मैसूरमधल्या दलितांनी बंड पुकारून मैसूरच्या राजवाड्यासमोर सामाजिक दडपणाचे विरोधात निदर्शने केली होती, याची माहिती देऊन मैसूर नगरपालिकेचे उपाध्यक्ष रामकृष्णय्या पुढे म्हणाले, 'त्या वेळेस मुस्लिमधर्माचा स्वीकार करणाऱ्या प्रत्येकाला मोहम्मद सैत यांनी सहाय्य देऊ केले होते. आपण त्याचा सल्ला मानला असता तर शेषाद्रि अय्यर आणि अन्य सवर्णहिंदूंच्या पोकळ आश्वासनांना बळी पडण्याची वेळ आपल्यावर आली नसती.'

## मतप्रवाह

'परिवर्तनाने भल्यापेक्षा वाईटच अधिक होईल. आपल्याला प्रथम राजकीय व आर्थिक सत्ता मिळवली पाहिजे' –इति जयप्रकाश नारायण, माजी आमदार, बंगलोर.

'बौद्धधर्मच आपल्या समस्या सोडवू शकेल. मात्र त्यासाठी जेसुइटससारखे ध्येयवादी कार्यकर्ते उभे करावे लागतील– इति के. सिद्दय्या, माजी आमदार.

'सर्वाधिक मानवतावादी असलेल्या इस्लामधर्माचाच मी पुरस्कार करीन'– इति डी. आर. नंजिया, पत्रकार, सेवानिवृत्त सरकारी अधिकारी.

'इस्लामधर्मातील धैर्य, आक्रमकता वाखाणण्याजोगी आहे. बौद्धधर्म आपणाला राजकीय सत्ता देण्यात कुचकामी ठरल्याने आपण इस्लामचा स्वीकार केला तर आपणास निश्चितच सामर्थ्य प्राप्त होईल'–इति नेरल मदय्या, विधानपरिषदेचे भूतपूर्व उपाध्यक्ष आणि श्री. एम. आर. राजरत्नम.

पृष्ठ १९ वर

कथा

# नवागत

सौ. कल्याणी हर्डीकर

टेकीला आलेल्या आणि मलूल झालेल्या गर्भवतीसारखं आकाश गच्च भरलं होतं, काळ्या करड्या ढगांनी; पण कोसळत नव्हतं, तड लागत नव्हती. वाराही चुकत-माकत पळत होता आणि ती भरली संध्याकाळ उदासल्यागत झाली होती.

पायावर पाय टाकून ती हे सारं निरखीत होती. एकटीच. हवेतला येणारा ओला हिरवा गंध छातीत भरून घेत, न कोसळणाऱ्या त्या भरल्या आकाशाकडे पाहात, ती नुसतीच बसून होती ... निर्विकार मनानं.

आज तिचे पाय या हवेतून पळायला उत्सुक नव्हते, किंवा एरवीसारखी अधाशीपणानं ती असल्या हवेत बसून काही वाचत नव्हती.

तिच्यातला हा बदल अनपेक्षित होता. तिच्या किती तरी वर्षांच्या सवयी मोडणारा हा बदल. कदाचित तिचा तिलाही न जाणवणारा.

असली हवा पडली की ती सारं सोडून लांबवर भटकायला जात असे. सोबत हवीच असं नाही. मग आकाश कोसळेपर्यंत ती वणवणत रहात असे.

आज मात्र हे काहीच आठवत नसल्यासारखी ती फक्त बसली होती कोणाचीही वाट न पाहता...

तिचा नवरा ऑफिसला गेला होता, सासू कुठे तरी देवळात, सासरे असेच कुठेतरी आणि ती एकटीच.

लग्नापूर्वी तिला दोन गोष्टींची फार भीती वाटायची. एकटेपणाची आणि शांततेची. त्या दोन गोष्टींवरच ती आता मात्र जिवापाड प्रेम करू लागली होती. अगदी नकळत.

'मिथिले, अग मिथिले, कसला विचार करत्येस ?'

'..................'

'नाही ना ऐकू आली हाक ?'

तरी तिची तंद्री भंगली नव्हती. सारं काही अनोळखी असल्यासारखी ती वागत होती. जगायचं म्हणून जगत होती निर्जीव यंत्रासारखी ... तिच्या सर्व नात्यांचे संबंधच हळूहळू संपुष्टात येत होते.

गेल्या पाच-सहा वर्षांत, तिच्या उसातल्या रसाचा थेंबन् थेंब शोषला गेला होता. चरकात दळदार ऊस घालून सगळा रस शोषून चिपाड मागं उरावं तशी ती उरली होती. ओढग्रस्त, नि:सत्त्व ... चेतनाहीन...

सगळं घर तिच्यातला हा बदल पाहात होतं; पण कुणाच्याच हातात काही नव्हतं. ज्याला जे सुचतील ते ते उपाय तो तो करत होता; पण हाती फक्त चोयट्या याव्यात, ही नियती होती...

'मिथिला, मी आलोय. चहा देतेस ना मला ? शकूनही येईल एवढ्यात ऑफिसमधून.'

वेगवेगळ्या आकाराच्या ढगांकडे पाहात असताना कुठल्या तरी खोल गुहेतून आवाज यावा, तसा तो वृद्ध आवाज तिच्या कानांवर आदळला.

तो आवाज वृद्ध असला तरी त्याला मायेचा कंप होता आणि दिशाहीन होतानाही मिथिलेला त्या वृद्ध आवाजाचा आधार वाटत होता. सर्वस्व उधळून गेल्यावरही हेलपटताना, 'मुली, एक दिवस नक्की असा येईल की तू सारं भरून पावशील !...' हा दिलासा देऊ शकण्याचं सामर्थ्य फक्त त्या आवाजात होतं आणि म्हणून सारं वाऱ्यावर उडून गेल्यावरही ती वाऱ्याला पाठ देऊन उभी होती. फळणाऱ्या-फुलणाऱ्या वेलीची वाट पाहात...

आपल्या अश्रू होत जाणाऱ्या डोळ्यांनी विष्णुपंत सुनेला न्याहाळत होते आणि मनाशी हळहळत होते. त्यांनी 'चहा देतेस ना ?' म्हटल्यावर ती खुर्चीतून एकदम उठली होती आणि उठता उठताच मटकन खाली बसली होती. जिवंतपणाची चमक डोळ्यांत येता-येताच त्याची धूनी झाली होती.

विष्णुपंतांच्या हे सारं सवयीचं होतं. ते दोन क्षण उभे राहिले. आणि स्वैपाकघरात गेले. तीन-चार कपांचं त्यांनी आधण ठेवलं.. रमाबाईंही कीर्तनाहून येण्याची वेळ झाली होती. शकूनही पाच-सात मिनिटात आला असता.

चहात साखर घालता घालता, त्यांना माप ओलांडून घरी आलेली सुदृढ सुस्वरूप मिथिला आठवली. त्याची एकुलती एक सून ... लग्नात कसा दृष्ट लागण्यासारखा जोडा दिसत होता. विष्णुपंतांनी योजल्याप्रमाणं सारं काही आजवर घडत आलं होतं. एकुलत्या एक मुलाचं उच्च शिक्षण ... त्याची चांगली नोकरी ... त्याचं थाटामाटातलं लग्न... स्वत:च्या कष्टाचं घर आणि सारं काही...

आणि गुणी सून... सुनेला पाहता पाहता ते स्वप्न रंगवू लागले होते सुंदर गुबगुबीत नातवाचं. त्यांची तेवढी एकच इच्छा पूर्ण व्हायची राहयली होती... हौसेनं त्यांनी घरासमोर एक छोटंस लॉन केलं होतं आणि ते करून घेताना मनाशी योजलं होतं ...

'सकाळच्या कोवळ्या उन्हात, शकूनचं गुबगुबीत पोरगं कुशीत घेऊन बसायचं आणि मग चहा प्यायचा. आपल्या मिशांनी त्याला गुदगुल्या करायच्या आणि खूप हसवायचं. तो लडिवाळ हसू लागला की त्या हसऱ्या शैशवाचे पोटभर मुके घ्यायचे नि तृप्तीनं तुडुंब व्हायचं !'

इतर अनेक स्वप्नाप्रमाणेच कितीतरी वर्षं ते हेही पाहात होते. मिथिला ते अस्तित्वात आणणार होती. चिमण्या-चिमण्या दुडदुडणाऱ्या पावलांना घेऊन तीही लॉनवर नाचणार होती. निगुतीनं उभी केलेली फुलझाडं एका शैशवाच्या दंगामस्तीनं मोडून पडणार होती.

विष्णुपंतांनी सहज एकदा चेष्टेत त्यांचं हे स्वप्न शकूनला सांगितलं होतं आणि

मिथिला लाजून चूर झाली होती. हरखली होती. तिच्या स्वप्नाळू डोळ्यात कितीतरी लाजाळू बुलबुल फडफडले होते. शकुनही हसला होता. जणू ते स्वप्न हलक्या पावलांनी मोघ्याच्या घरात शिरत होतं; पण कोणास ठाऊक काय झालं ?

त्या मऊशार तान्हुल्या स्वप्नांचे रंगच पार उडून गेले. मिथिलेच्या रेशमी कुशीतून ते पाऱ्यासारखे सुळकन निसटून गेले. एकदा नव्हे दोनदां नव्हे, बहरानं ओघून जाण्याचाच नियम बनला ... बहराला फळ धरलंच नाही... का ? कारण काही नाही...... मिथिलेची कूस समर्थ असूनहीं तिला गर्भभार पेलवला नाही. नऊ महिने स्वप्न तिच्या कुशीत झोपलंच नाही. त्या जावळगंधी स्वप्नाला घाई होती वेगळीच... ओढ होती निराळीच. मिथिलेच्या मनाच्या चिंध्या उडवत ते हलक्या पावलांनी येई तसंच निघूनही जाई. आपल्या अस्तित्वाच्या कोणत्याही खुणा मागे न ठेवता, आपल्या सोबत मिथिलेचा आनंद हिसकावून घेत तिच्या शरीराच्या मनाच्या चिंध्या करत...

नि मग सतत हसणारी, चिवचिवणारी मिथिला हसायचं, बोलायचंच विसरून गेली. तिच्या स्वप्नाळू डोळ्यातली पाखरं! माना मोडून पडली. मोघ्यांच्या घराला एक उदास कळा आली. सारी माणसं यंत्रवत झाली. भावनांचा कोळपून कोळसा झाला !

'*अप्पाऽ चहा उकळून गेलाय.*' शकुनच्या आवाजानं विष्णुपंत भानावर आले आणि त्यांनी चहा उतरवला. स्वैपाकघराच्या खिडकीतून त्यांनी बाहेर पाहिलं. मिथिला अजूनही एकटीच शून्यात नजर लावून बसली होती. शकुनच्या हातात भरला कप देता देता विष्णुपंत म्हणाले,. 'पोरा, हे किती दिवस चालायचं असं ?'

'ते तुमच्या इतकेच मला माहीत, अधिक काय सांगू ? '

'तिला डॉक्टराकडे घेऊन जा पुन्हा. बघ ना कशी सुकून गेलीय, जेवत नाही. झोपत नाही. तासन तास कसला तरी विचार करत नुसती बसून राहते अरे, वेड लागेल रे तिला एखादे दिवशी !'

'शेवटी तेच व्हायचंय अप्पाऽ, तिला एकटीला वेड नाही लागायचं. मीही वेडा होणार आहे काही दिवसात !'

'शकुनऽ'

'मला दिसतंय, अनुभवायला लागतंय त्यावरूनच बोलतोय मी अप्पाऽ. असं बोलताना मला फार सुख होतंय असं का वाटतंय तुम्हाला ? '

'नाही रे पोराऽ गैरसमज करून घेऊ नकोस; पण तूच तिला सावरायला हवस. आधार द्यायला हवास. तिचा जीव गुंतवायला हवास ती पुन्हा हसली पाहिजे, बोलली पाहिजे. चिवचिव करत घरभर फिरली पाहिजे. त्या नक्षत्रासारख्या मुलीची ह्या घरात दशा-दशा झालीय ! जा तिला हाताला धरून घेऊन ये घरात !

'नाही, मी आणणार नाही. तुम्हीच घेऊन या तिला आत!'

'का रे बाबा... ?

'दोन महिने झाले, मला स्पर्श करणं सोडलंय तिनं. मध्ये एकदा माझ्या हातून नको ते होऊन गेलं अप्पा, तेव्हापासून माझी सावली सुद्धा वर्ज्य केलीय... '

'शकुनऽ'

'मला आणखी काही विचारू नका अप्पाऽ संसारसुख काही नशिबी नाही. अलीकडच्या प्रत्येक रात्रीनं मला भाला घेऊन भोसकायचं तेवढच बाकी ठेवलंय ! मी सुद्धा काय कमी कोंडमारा सहन केला...? त्या रात्री मलाही असह्य झालं अप्पाऽऽ. माझ्याही संयमाला काही मर्यादा आहेत. '

'*मला कळतेय तुझी तडफड शकुन...*'

'अप्पा, अप्पा, मी तिला प्रत्येक वेळी फुलवली ती तिचा सगळा बहर ओरबाडून टाकला जावा म्हणून नाही हो, पण झाले भलतंच... तिनं माझाच धसका घेतलाय.'

'तुझ्या मनाची चीरफाड कळत नाही *मला असं का वाटतं ? तुला पण अवेळी* झालेली तिन्हीसांज थोपवणार कोण ? फक्त वाट पाहायची, प्राक्तनातले भोग सपेपर्यंत वाट पाहायची. '

'तुम्हाला खरंच वाटतं अप्पा हे प्राक्तन आहे ?'

'मग काय म्हणणार तू ? जाऊ दे ते. आज मात्र तू काहीही करून तिला डॉक्टराकडे घेऊन जा. तिला चकरा येतायत सारख्या अन्नावरची वासनाच गेलीय तिची. '

'डॉक्टराचाही जबरदस्त धसका घेतलाय तिनं. परवा अरविंदनं तिला तपासायला घेऊन ये म्हटलं तर ती दवाखान्यातच चक्कर येऊन पडली. सगळं हाताबाहेर गेलंय...अरविंद म्हणत होता ...

'मूल झाल्याशिवाय मिथिला सुधारणाऽर नाही म्हणून !'

'तुम्हाला कुणी सांगितलं ?'

'ते सांगायला डॉक्टरच कशाला हवा ? कोणीही सांगेल ते. रागावू नकोस तू; पण मिथिला आई झाली पाहिजे असं म्हणताना अरविंद गॅरंटी देतोय का पुढची सगळी...?'

'काय बोलताय तुम्ही ?

'खरं तेच बोलतोय. नऊ महिने तुझा गर्भ तिच्या पोटात जिवंत राहून, तिच्या जीवाला जराही अपाय न होता— जन्मालाही जिवंतच येईल अशी व्यवस्था करू शकेल का तो ? अशी संजीवन देणारी औषधं असतील त्याच्यापाशी ? बोल ना ?'

'...........'

'तुझ्याजवळ उत्तर नाही शकुन याला, तुझ्या मित्राजवळ अशी औषधं नाहीत. ती अत्याधुनिक असतील; पण मिथिलेच्या प्राक्तनापर्यंत ती पोचू शकणार नाहीत. त्या डॉक्टराचे हात आणि ती औषधं शरीरापर्यंत पोचणारी आहेत शकुन, माणसाच्या प्राक्तना पर्यंत पोचणारी नाहीत ! तसं असतं तर मागल्या खेपेला तो त्या चिमण्या जीवाला वाचवू शकला असता...पण मग मिथिलेच्या *भाळीचे भोग कोणी भोगले असते ?* ...

—तिच्या नशिबी संतानसुखाचा योग फार खडतर आहे शकुन...सुखाच्या रेषा फार थोड्या आहेत. '

'अप्पा ऽ तुम्ही कधी कधी काय बोलता तेच समजत नाही. '

'तसं मी फार सोपं बोलतो रे, अगदी सोपं; कारण ललाटीचे लेख आणि हातावरच्या रेषा वाचायचं दुर्भाग्य माझ्या वाट्याला आलंय...'

'अप्पा ऽ एक आठवलं म्हणून विचारतो, परवा उमावहिनी म्हणत होत्या...'

'घुटमळलास का शकुन ऽ विचार ना !'

'म्हणत होत्या, अप्पांनी ही वास्तु विकत घ्यायला नको होती. कारण ही शापित आहे. वास्तु विकत घेतानाच तुम्हाला सांगितलं होतं बऱ्याच जणांनी; पण तुम्ही त्या वेळी टवाळी केलीत सगळ्याची, कुणाचं

सुद्धा म्हणणं ऐकलं नाहीत ! ...'

शकुनच्या या शब्दानी विष्णुपंतांचा चेहरा खर्रकन उतरला. त्यांना काय बोलावं तेच सुचेनासं झालं. ते फक्त चकीत होऊन शकुनकडे पाहात राहिले.

'अप्पा ऽ मी म्हणतोय ती गोष्ट खरी आहे ना ? या वास्तूला नि:संतान होण्याचा शाप आहे ना ? बोला की !'

'असं लोक म्हणायचे शकुन ऽ माझा त्यावर विश्वास नव्हता आणि नाही...'

'मिथिला कोळपून चाललीय तरी तुमचा विश्वास बसत नाही अजून...? कसली वाट पाहताय तुम्ही ?'

'माझा विश्वास बसतोय, असंच म्हटलं पाहिजे आज तरी.'

'मग आता काय करायचं ठरवलंयत तुम्ही ? इथं गळघाला तात लागायची वेळ आली तरी का नाही केलात तुम्ही या शापित वास्तूचा गौप्यस्फोट ? इतरांना अनेक उतारे सांगितले, मंत्रतंत्र दिलेत, मी तर तुमचा पोटचा पोर ! का नाही सुनेला एखादा उतारा सांगितलात ?'

'शकुन ऽ अजूनही सांगतो तुला, कुणाच्या शापित वास्तूनं दुसऱ्या कुणाचं नि:संतान होत नाही आणि केवळ उताऱ्यानं भोग भोगायचे सुटत नाहीत. भोग संपले, ग्रहदशा मिटली की सगळं सुरळीत होईल.'

'आग लागो, तुमच्या ह्या ज्ञानाला ! शेवटी बळी घेणार आहात तुम्ही तुमच्या सुनेचा ! ...'

कधीही आवाज न चढवणाऱ्या शकुनचा आवाज तारसप्तकात लागला होता. संतापानं तो थरथरत होता. त्याचे डोळे तांबरले होते.

'तुमचा हा असला पगदस्ती स्वभाव माहीत नव्हता अप्पा मला, स्वत:च्या हट्टासाठी खायीत लोटलंत तुम्ही आम्हाला ...'

विष्णुपंत तरीही शांतपणानं कोपऱ्यात उभे होते शकुनच्या ललाटीच्या लेखाचा अंदाज घेत. नि:स्तब्ध !

बाहेरून आलेल्या रमाबाईंना हा सीन सर्वस्वी वेगळा होता. शकुनकडं पाहून त्यांच्याही हातापायाला कापरं भरलं होतं आणि त्या तशाच आ वासून पाहात राहिल्या होत्या. त्यांच्या हातातली कोयरी आणि पिशवी गळून पडली होती. लाल कुंकवाचा आणि पिवळ्याधमक हळदीचा सडा त्यांच्या पावलाशी पडला.

विष्णुपंतांनी 'तथास्तु' म्हटलं.

म्यँव म्यँव करत एक मांजराचं पिल्लू कळवळत त्या पिशवीतून बाहेर पडलं आणि सैरभैर होऊन स्वत:भोवतीच घोटाळू लागलं. बाहेर अंधारून आलं होतं. बोलण्याच्या नादात घरात दिवाही लावायचा राहून गेला होता. मोघ्यांच्या घरची शिस्त आज बिघडली होती. अंधारात तिघंही उगीमुगी होऊन काही क्षण उभी राहयली. रमाबाई लगबगीनं पुढं आल्या. त्यांनी दिवा लावला. त्यांची नजर भिरभिरली. मिथिला घरात दिसत नव्हती.

ते मांजराचं पिल्लू किंचाळतच होतं. शकुनचा संताप अजूनही कमी झाला नव्हता. त्याच्या तापलेल्या मनस्थितीत ते मांजराचं किंचाळणं मनस्वी आग ओकत होतं. तो तरा तरा पुढे आला आणि त्यानं त्या पिलाची मानगूट पकडली. ते पिल्लू आणखीनच घाबरून गेलं.

'हे मांजरडं कशाला इथं? नसती ब्याद !' असं म्हणून त्यानं ते बाहेर फेकून दिलं. रमाबाईंना त्याच्या रानटीपणाचा विलक्षण संताप आला होता. ते गोजिरवाणं पिल्लू त्यानं कुठलीही पर्वा न करता भिरकावून दिलं होतं आणि ते पिल्लू भेलकाडत मिथिलेच्या पायांशी पडलं. घरात येणारी मिथिला क्षणभर थबकली. ते पिल्लू भयानं थरथरत होतं आणि केविलवाणं होऊन ओरडत होतं.

'म्यँवऽऽ म्यँव ... मी येऊ ? मी येऊ... घ्या ना मला !'

नकळत मिथिला खाली वाकली. तिनं ते पिल्लू उचलून पोटाशी घेतलं आणि अगदी हळुवारपणानं त्याच्या अंगावरून हात फिरवायला सुरुवात केली. त्या पाढऱ्याशुभ्र गुबगुबीत रेशमाचा स्पर्श होताच ती अंतर्बाह्य थरारली...

तो स्पर्श तिच्या ओळखीचा होता जणू.. हो, ओळखीचाच होता. मऊ मऊ लुसलुशीत स्पर्श. ममत्वाचा गंध असलेला स्पर्श... वेदनाची जाणीव संपवून टाकणारा स्पर्श... अरूपाला रूप देणाऱ्या संवेदनाचा तो स्पर्श तिच्या कृश अंगभर भिणभिणला आणि तिचं गात्रन् गात्र वात्सल्यानं भरलं. सचेतन झालं... सत्त्वशील बनलं.

तिसऱ्या खेपेला मरणाशी झुंज देऊन ती गलितगात्र झाली होती. नऊ महिने भार वाहून थकली होती. भयानं व्याकुळ झालेली असतानाही ती वाट पाहात होती. त्या अनाम चिमण्याची...

सगळं अंग घामानं निथळत होतं. घशाला कोरड पडली होती. डोळ्यावर निळी जांभळी ग्लानी आली होती नि तरी त्यावर मात करत, तशा विव्हल–विद्ध अवस्थेत ती सिस्टरला म्हणत होती...' सिस्टर, मलाऽमला त्याला कुशीत घ्यायचंय होऽ. द्या ना माझ्या जवळ त्याला !'

'आता नाही बाई, जरा वेळानं. त्या मुलाची तब्येत ठीक नाही. तो रडला की तुमच्याजवळ देईन मी !'

आणि ते मूल रडण्याची ती कितीतरी वेळ त्या वेदनामयी अवस्थेतही वाट पाहात राहयली आणि तो अनामिक तिला हुलकांडी देऊन, न रडताच निघूनही गेला ! मृण्मय झाला... त्याला तशा अवस्थेत तिनं कुशीत घेतलं होतं... अगदी घट्ट, त्याच्या काळधाशार जावळातून हात फिरवला होता ... त्याच्या इवल्या दुग्धमुखी ओठावर तटतटलेले स्तन टेकवले होते. नि ती ढसढसा रडली होती नि मग बधिर होऊन गेली होती... सगळ्या संवेदना हरवून बसली होती.

त्या कोवळ्याशार उपजत मृत असलेल्या नवागत स्पर्शानं बधिरली होती, ताठरली होती; नि त्याचसाठी आसुसलीही होती; पण भ्यायली होती. धास्तावली होती नि झुरतही होती आणि त्याच त्या स्पर्शाची ही आठवण...'

पण हा जिवंत स्पर्श ! अगदी तसाच... त्या नवागतासारखा नव्हे तोच...मृदु–मुलायम पण मांजराच्या पिल्लाचा...मांजर ! मांजर म्हणजे मृतात्म्याचं रूप...मृतात्म्याचा अंश...वासना अतृप्त राहयल्या म्हणजे ते जन्म घेतं म्हणे. मोठी इन्नी नेहमी म्हणायची ...'मांजर म्हणजे मृतात्मा असतो मग? माझं ते न रडलेलं बाळच असेल हे...'

विचार करता करता मिथिला भूतकाळात गेली होती मिथिलेचा ऊर धपापत होता नि विचार चक्र वेगात धावत होतं त्याच्या सर्वांगावरून तिचा हात फिरत होता अतीव मार्दवं आणि तेही तिच्या पदरात घुसून

खुसखुसत होतं.

'मिथिले ऽ अग, किती वेळ अशी बाहेर उभी राहणार आहेस? आत ये. केव्हाचं अंधारून आलंय...' रमाबाई तिला हाका मारत होत्या. त्या माजराच्या पिल्लाला छातीशी घट्ट कवळीत मिथिला आत आली आणि आपल्या लाघवी स्वरात कितीतरी दिवसानी तिनं शकुनला हाक मारली. 'शकुन! आपण पाळू या का रे हे मांजर?'

तिचे खोल गेलेले डोळे आज चकाकत होते आणि ओठाच्या कडाशी हसू रेंगाळत होतं. तिचा निर्विकार चेहरा आणि चेहऱ्यावरला ओढग्रस्त बधिरलेला भाव, जिवंतपणाच्या संवेदनेनं जागा होऊ लागला होता. कितीतरी दिवसांनी मिथिला माणसात आल्यासारखी दिसत होती. संतापलेला शकुन नुसता पाहात राहिला होता. कोणतंच उत्तर द्यायचं भान त्याला राहयलं नव्हतं.

रमाबाईंच्या आणि विष्णुपंतांच्या चेहऱ्यावर टवटवी आली. संध्याकाळच्या त्या कातरवेळेला हळद माखल्या पावलानी ते पिल्लू मोघ्यांच्या घरात आलं होतं. कोणत्या तरी अतर्क्य अज्ञाताला सामोरं जाण्याचं सामर्थ्य घेऊन...

आणि त्याची कल्पना कोणालाच नव्हती... अगदी कोणालाही नव्हती... भोगांच्या गोष्टी कळणाऱ्या विष्णुपंतांनाही!

घरात ते माजराचं पिल्लू आलं आणि मिथिला सुधारू लागली. एखाद्या लहानग्याला वाढवावं तशी ती त्याला वाढवत होती. बोळघानं दूध पाजण्यापासून त्याचं करत होती...

दुःखानं वेडावलेल्या तिच्या असहाय स्थितीत तिच्या नकळत मांडल्या गेलेल्या डावाचे फासे तिच्या बाजूनं पडून गेले होते.

ते पिल्लू तिचं अवघं भावविश्व व्यापून उरलं होतं. ती त्याचं लहान मुलाचं करावं त्या मायेनं सगळं करत होती. त्याला साफसूफ ठेवत होती. त्याच्या भुकेच्या वेळा पाळत होती. आपल्याच अंथरुणात त्याला झोपवत होती. 'मणीऽमणी' असं सतत त्याला हाकारत होती. त्याच्या पुढ्यात बॉल टाकून लहान मुलासारखी त्याच्याशी खेळतही होती.

ते पिल्लूही तिलाच प्रेम लावत होतं. भुकेच्या वेळेला तिच्या पायाला घासत-घासत घोटाळत होतं. आपलं मऊ मऊ अंग, डोळे मिटून घेऊन घासटत तिच्याशी असलेली जवळीक व्यक्त करीत होतं. त्याची घसट होती ती फक्त मिथिलेशीच!

आणि मिथिलेचं जगही फक्त तिचं आणि मण्याचंच झालं होतं. तिचा लहानगा, चिमणा मण्या गबगबीत अंगाचा, पांढऱ्याशुभ्र रंगाचा, झबकेदार शेपटीचा. तिनं 'मण्या' असं म्हणून हाक मारताच तिच्याकडे आपले डोळे उघडून पाहात राही. तिला जगावंसं वाटायला लावी.

निळ्याशार जिवंत आकाशाचा तुकडा आपल्या डोळ्यांत बाळगून वावरणारा तिचा मण्या, तिच्या जीवनातला एक अविभाज्य भाग बनला होता. तिला जगायला शिकवत होता, लळा लावत होता. तीही त्याला तळहातावरच्या फोडासारखी जपत होती. मुलासारखं त्याचं सारं करत होती. समाधानानं फुलत होती, सुखावत होती.

मण्याला खेळवत एकदा मिथिला अशीच लॉजवर बसली होती. बाहेर बेल वाजल्याचं जाणवल्यामुळे ती उठून दार उघडायला गेली. मण्या लॉजवर एकटाच राहयला आणि दुसऱ्याच क्षणी मण्याचं जोरजोरानं फिसकारणं मिथिलेच्या कानावर आलं. घाबऱ्या घाबऱ्या काय झालं म्हणून बघायला बाहेर आली तो काय? तिच्या पायांना ते दृश्य बघून कापरं भरलं होतं, घशाला कोरड पडली होती.

एका भलाथोरला बोका मण्याच्या पुढ्यात दात विचकत गुरगुरत, फिसकारत पंजे उभारून उभा होता आणि मण्या भेदरून शेपटी फुलारून जिवाच्या आकांतानं ओरडत होता.

ती जीव एकवटून धावत पुढं गेली होती नि तिनं त्याला कुशीत घेतलं होतं. भयानं कितीतरी वेळ मण्या थरथरत राहला होता. त्याच्या अंगावर उठलेल्या ओरखड्यावरून कितीतरी वेळ हात फिरवत मिथिला रडत राहली होती. त्या मण्यालाही मृत्यू दिसला होता.

त्या दिवसापासून मिथिलेनं त्याला कधीच एकटं टाकलं नव्हतं. सतत ती त्याच्या पाठीशी सावलीसारखी वावरत होती.

पाकोळ्यांचे पंख लावून दिवस झरझर सरत होते. बागेत झाडांना नवा मोहोर धरला होता. मिथिलेचं शरीरही तिच्या नकळत मोहरलं होतं. स्त्रीत्वाची सृजनात्मक जाणीव तिच्या गात्रागात्रातून ओसंडत होती.

दुःखानं वेडावलेल्या तिच्या असहाय स्थितीत शकुननं सांत्वनाचं चांदणं शिंपीत मांडलेल्या डावाचे फासे तिच्या बाजूनं पडले. सफलतेचं पुरेपूर दान तिच्या पदरात टाकून गेले होते. हळव्या झालेल्या तिच्या कुशीत शकुनचा अंश रुजला होता. दिसामासान वाढत होता.

'मण्या' घरात आला होता तेव्हा तिला दुसरा संपून गेला होता आणि ज्या वेळी तिच्या हे सारं लक्षात आलं त्या वेळी तिसराही सरत आला होता. इरखन न जाता ती शांतच राहिली होती.

मण्या मोठा होत होता आणि मिथिलेच्या देहकळाही उमलून येत होत्या...टपोरदार गेंदासारख्या...मागं अशी ज्या वेळी चाहूल लागली होती त्या वेळी सगळं सोपस्कर तिनं मन मारून इतरांसाठी करून घेतले होते; पण आता मात्र कोणतेच सोपस्कार तिला करावेसे वाटत नव्हते. चोरचोळी नाही, हिरवागच्च चुडा नाही, ओटी भरणं नाही. हवं नको काही नाही! तिच्या गर्भातला हा येणारा नवागत अगदी शांत होता.

आपल्या अस्तित्वाची कोणतीच दखल न देता तो आला होता. तिला तो हवा आहे का नको आहे, याची पर्वा न करता; पण चिवटपणानं...

पाच महिने कसे निघून गेले हे तिलाही कळत नव्हतं. तिला अचंबा वाटत होता... स्तन फक्त खूप फुगीर दिसण्यापलीकडे तिच्या शरीरात तसा तिला वेगळा बदल चार महिन्यांपूर्वी कोणताच जाणवला नव्हता...

पहिल्या दोन-तीन खेपांत गर्भ राहल्यानंतर पोटात साधं पाणीही ठरलं नव्हतं नि जीवघेण्या पोटातल्या कळांनी तिला बेजार केलं होतं, अगदी वेणा यायच्या क्षणांपर्यंत!

पण ह्या वेळेला काहीच जाणवलं नव्हतं. कोणतेच डोहाळे लागले नव्हते. हवं-नकोसं झालं नव्हतं. काहीच दुखलं-खुपलं नव्हतं. वेदनांचं दर्शन झालं नव्हतं. फक्त घेऱ्या यायच्या. त्याही तिला वाटत होतं अशक्तपणानं येत असतील.

पण हे घडायचं होतं. वेलीला फूल धरायचं होतं. झोपाळ्यांवाचून पुन्हा एकदा साऱ्यांनी स्वप्नांच्या झोल्यांवर झुलायचं होतं. वरवर सगळी हसतमुख दिसत असली तरी दिलेल्या तारखेकडे पाहात सगळीच धास्तावल्या मनानंच वावरत होती...

का कोणास ठाऊकपण विष्णुपंतांनी मात्र सुनेच्या पाठीवरून हळुवारपणानं हात फिरवत धीर दिला होता, 'सूनबाई, निश्चिंत अस! या वेळी सगळं काही तुझ्या मनासारखं होईल. कोणतेही शाप किंवा कोणाचीही शापित वास्तू तुझ्या सुखाच्या आड येणार नाही...विश्वास बाळग! वक्री असलेले ग्रह आता मार्गी झाले आहेत!'

अज्ञाताची चाहूल थोडीफार जाणू शकणाऱ्या विष्णुपंतांची वाणी वाया गेली नाही...मिथिला आई झाली...कुठलाही त्रास न होता...सिझरिंग न करता .... शकुनच्या मुलाची मिथिला आई झाली--

सगळं घर आनंदानं फुलून गेलं. मिथिला मात्र हरखून न जाता शांत होती. वरवर शांत दिसत होती; पण मनातल्या मनात धास्तावली होती—

इकडे घरात मात्र मण्यानं म्यॉव ऽ म्यॉव करत सहा—सात दिवस नुसता गोंधळ घातला होता. तो मिथिलेला शोधात राहयला होता. तिनंच येऊन रोजच्या ताटलीत दूधभात घालावा म्हणून घोटाळत होता आणि ती दिसत नाही असं पाहून तसाच उपाशी तिच्या खोलीतल्या कपाटावर नेहमीच्या जागी जाऊन पडत होता.

रमाबाई त्या मुक्या जनावराची ती घालमेल पाहून हेलावत होत्या, त्याला चुचकारून त्यानं दूध प्यावं म्हणून त्याच्या पुढ्यात ठेवत होत्या. मध्येच कधीतरी ताटलीत तोंड घालून ती बाजूला होत होता तर कधी डोळे मिटून ताटलीजवळचं मिथिला येईल म्हणून ताटकळत बसत होतं...

मिथिलेलाही मण्याची आठवण येत होती. आणि तो पुढ्यातला इवलासा तांबडालाल जीव पाहून तर अधिकच. त्यानंच तिला सावरलं होतं, नव्हे त्याच्या आगमनानंच तिचं सारं सुरळीत झालं होतं. त्या शापित वास्तूतल्या सर्व दुष्ट वासनाचा, पापाचा, संकटाचा भार त्या मांजरानं जणू आपल्या शिरावर घेतला होता.

दहाव्या दिवशी हॉस्पिटलमधून घरी पाऊल ठेवताच मिथिलेनंही मण्याला आधी छातीशी घट्ट धरलं. आपल्या हातानं त्याला दूधभात खायला घातला आणि मण्यानंही आपलं तिच्या पायांस अंग घासून घासून पुरेवाट केली. पायाच्या अंगठ्याला हळुवारपणानं दात लावून, चावा घेऊन कृतज्ञताव्यक्त केली...

विष्णुपंतांच्या म्हणण्यावरून बाराव्या दिवशी नाव ठेवायचं ठरलं. मिथिलेच्या पोळल्या मनात धाकधूक होत होती; पण तिनं धैर्य एकवटलं होतं.

घरात गडबड उडाली होती. पाहुणे जमले होते. उत्साहाला उधाण आलं होतं. शकुनही खुषीत होता.

दिवसभर जमलेल्या सगळ्या नात्यागोत्यात आणि त्यांच्या कोडकौतुकात मिथिला बुडाल्यासारखी झाली होती. तिचा चिमणा युवराजही तसाच कोडकौतुकांत डुबत होता; पण मिथिलेचा उजवा डोळा मात्र मध्येच लवत होता.

ते मोघ्यांचं घर आज खूप दिवसांनी असं हसत—फुलत होतं; पण अदृष्टाच्या आशंकेनं तिच्या मनात काहूर उठलं होतं...

मण्याच्या अस्तित्वाची कोणाच्याही मनात दखल नव्हती. अगदी मिथिलेच्या सुद्धा. मिथिला हॉस्पिटलमधून घरी आल्या दिवसापासूनच मण्यानं, छोट्याच्या पाळण्याशेजारी असलेल्या कपाटावर ठाण मांडलं होतं नि चोवीस तास पहाऱ्याला बसावं तसा तो तिथं वेटोळं करून पुढच्या पायावर मान टेकवून बसून होता; पण आत्ता मात्र तो तिथं नव्हता. घरात कुठं दिसत नव्हता. एकेक अनोळखी माणस दिसताच त्यानं पोबारा केलेला होता...

संध्याकाळही टळून जायला आली होती. मोघ्यांच्या छोटेखानी बंगल्याच्या गेटजवळच्या बकुळीच्या झाडाआड मावळतीचा हुरहुर लावणारा तांबडा लाल प्रकाश रेंगाळत होता... अंधाराच्या दशा चोहोबाजूंनी त्या प्रकाशाला गिळीत क्षणाक्षणानं अधिकच काजळी होत होत्या.

रस्त्यावर मात्र कल्लोळ माजला होता... शेजारच्या बंगल्यातल्या विमलाबाईच्या मोकळ्या सोडलेल्या आडदांड अल्सेशियन कुत्र्यानं डाव साधला होता. रस्ता पार करून घरात शिरत असणाऱ्या मण्यावर त्यानं झडप घातली होती नि त्याच्या कोवळ्या शुभ्र मानेत आपले सुळ्यांसारखे दिसणारे शुभ्र क्रूर दात रोवले होते. त्याचं नरडं फोडलं होतं! मिथिलेचा मण्या मोघ्यांचं मांजर-मेलं होतं! क्षणात गतप्राण झालं होतं, कोणी मदतीला यायच्या आत!!

शत्रूचा नायनाट केल्याच्या विजयोन्मादानं तो आडदांड कुत्रा जोरजोरात भुंकत होता. सारी गल्ली त्याच्या रानटी विजयोन्मादानं दुमदुमत होती.

इकडे मिथिलेच्या बाळाला पाळण्यात घालून त्याचं नाव ठेवलं होतं 'अमृत!' बाळ शांत पाळण्यात पहुडला होता. रात्र अंधारून वर येत होती.

मण्याचा प्राण केव्हाच उडून अंतरात्म्यात विलीन झाला होता! त्याच्या त्या निळ्या डोळ्यातलं चिमणं आकाश अंधारल्या आकाशात मिसळलं होतं नि रक्ताच्या थारोळ्यात पडलेला 'मण्या' अधिकच केविलवाणा दिसत होता.

झोपेत मश्गुल असलेला चिमणा राजा, आधी शांत होता; पण काही क्षणातच कोणी तरी कडकडून चावा घेतल्यावर आक्रंदन करावं तसा चवताळून रडत राहयला होता. पिसाळला होता... त्याला चुचकारून, शांत करूनही काही जमेना... तो दूधही पिईना!

बकुळीच्या झाडाआड उभ्या असलेल्या, कुणाला न दिसणाऱ्या निर्विकार, नियतीच्या चेहऱ्यावरून मात्र याक्षणी हसू ओघळत होतं, आणि 'तथास्तु.' म्हणत, तिनं त्या शापित वास्तूवर हात उचलला होता! □


**व्हान गॉग**

'लस्ट फॉर लाइफ' या
आयर्व्हिंग स्टोनच्या
जगप्रसिद्ध कलाकृतीचा
मराठी अनुवाद

अनुवादिका
माधुरी पुरंदरे

प्रकाशक
प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे

# कै. र. वा. दिघे

## एका समृद्ध वाङ्मयप्रकाराची गंगोत्री

लो. टिळकांच्या निधनानंतर एका युगाचा अस्त झाला. जणू काही त्यांच्या जाण्याने सूर्यास्त झाला की काय असे वाटू लागले; पण भारताच्या सुदैवाने म. गांधींच्या रूपाने चंद्रोदय झाला. एका वेगळ्या युगाची सुरुवात झाली. या महात्म्याने बघता बघता अवघ्या भारताच्या कानाकोपऱ्यात स्वातंत्र्याचा महामंत्र पोचविला. जीवनाच्या साऱ्या क्षेत्रांचा, अंगांचा विचार त्यांनी केला. खेड्यांची दुर्दशा होण्यास शहरांचे अनावर आकर्षण कारणीभूत आहे हे त्यांच्या तेव्हाच लक्षात आले. 'चले जाव,' 'चरखा,' 'खादी' हे केवळ शब्द न राहता त्यांना मंत्राचे सामर्थ्य प्राप्त झाले. तसेच बल प्राप्त झाले 'खेड्याकडे चला' ह्या शब्दांना. शहरात, त्याच परिघात वावरणारा पांढरपेशा मध्यमवर्गीय लेखक भोवताली पसरलेल्या खेड्याकडे एका वेगळ्या नजरेने पाहू लागला. त्याला खेड्यातले समृद्ध निसर्गसौंदर्य खुणावू लागले, तेथील अफाट दारिद्र्य आणि अज्ञान जाणवू लागले. त्याचबरोबर तेथील माणसांची निरागसता आणि बेरकीपणा, भाबडेपणा आणि बनवेगिरी यांचेही भान आले. मुळात खेड्यात राहणाऱ्या—पण शहरात स्थायिक झालेल्या या लेखकांना त्यांच्या बाल्याने जणू काही साद घातली. पोरवयात पाहिलेला निसर्ग त्यांच्याभोवती फेर धरून नाचू लागला.

पुण्यासारख्या ठिकाणी वकिली करणाऱ्या अ‍ॅड. र. वा. दिघे नावाच्या संवेदनाक्षम आणि पिंडाने कवी असणाऱ्या एकाला त्या निसर्गाची हाक ऐकू आली. प्रत्यक्ष पाहिलेला निसर्ग दुराव्यामुळे अधिकच लोभसवाणा वाटू लागला, हळवा बनवू लागला. त्या परिसरातील – ज्या परिसरात आपण मुक्तपणे वावरलो – सारे गुणदोष घेऊन जन्माला आलेली ती माणसे त्यांच्या नजरेसमोर उभी राहिली, त्यांच्या कानात आपली सुखदु:खे सांगू लागली, त्यांना आपल्याकडे बोलावू लागली. त्या साऱ्यांचा जबरदस्त परिणाम झाला, त्या निर्माण झालेल्या आवर्ताने त्यांचे अंतर्बाह्य जीवन व्यापून टाकले. जे कल्पनेच्या पातळीवर होते, नजरेसमोर अंधुकपणे, अस्पष्टपणे उभे होते त्याला आकार येऊ लागला. ते आकार शब्दरूप धारण करू लागले आणि त्यातून निर्माण झाली 'पाणकळा' ( इ. स. १९३९ ) ही सोनसळ्यासारखी कादंबरी. एका विशाल प्रवाहाला जन्म देणारी, एका अनोख्या वाङ्मयप्रकाराची जन्मोत्री, गंगोत्री होती. प्रा. ल. ग. जोग यांनी तर 'एका नव्या सोन्याच्या खाणीचा शोध' या शब्दात तिचे वर्णन केले आहे. मी एकदा दिघ्यांना विचारले की 'तुम्ही ही कादंबरी लिहायला घेतलीत, लिहू लागलात तेव्हा आपण एका वेगळ्या तऱ्हेची कादंबरी लिहीत आहोत असे वाटले होते काय?' ते म्हणाले, 'मी एका वेगळ्या प्रकारच्या कादंबरीची निर्मिती करतो आहे याचे पूर्ण भान मला होते.' त्यानंतर एकामागोमाग जन्माला आल्या 'सराई', 'पूर्तता', 'निसर्गकन्या रानजाई,' 'गानलुब्धा मृगनयना', 'वसंतराव आणि चाळीस चोर', 'पड रे पाण्या', 'कार्तिकी', 'सोनकी' यासारख्या एकापेक्षा एक वेगळ्या आणि जबरदस्त कादंबऱ्या आणि लघुकथासंग्रह. दिघे यांनी 'पहिले बक्षीस'. 'वादळ' इ. सारख्या सरस-रमणीय, कथानकप्रधान कथा लिहिल्या असल्या तरी, नाट्यलेखनाचा प्रयत्न केला असला तरी ते ओळखले जातात ते एक यशस्वी आणि लोकप्रिय कादंबरीकार म्हणून. ऐन तारुण्यात असताना कवितासखीही त्यांच्यावर लुब्ध झाली होती. रूढार्थाने त्यांनी नंतर काव्यलेखन केले नसले तरी त्यांची प्रत्येक कादंबरी त्यांच्या कविमनाची साक्ष पटविते यात शंकाच नाही.

त्यांची कादंबरीकार म्हणून योग्यता किती मोठी आहे हे जर पहावयाचे असेल तर 'पाणकळा', 'आई आहे शेतात', 'पड रे पाण्या' या कादंबऱ्या अवश्य वाचल्या पाहिजेत. पाश्चात्य लेखकांशी तुलना करण्याचा मोह तुम्हाला झाला तर नवल वाटण्याचे कारण नाही. व्यापक पार्श्वभूमी आणि सूक्ष्म जीवनदर्शन ही काही पाश्चात्यांचीच मिरासदारी आहे आणि आपले लेखक केवळ डबक्यातच वावरताहेत असे समजण्याचे कारण नाही. त्यांनी कुलाबा जिल्ह्यातील खोपोलीचा परिसर जरी आपल्या लेखनासाठी घेतला असला तरी तो निसर्ग, ती माणसे आपल्याला मोहून टाकतात; पण ते केवळ एकाच चित्राच्या अनेक प्रती काढीत बसले असेही समजू नका. ती प्रत्येक कादंबरी आपापले वेगळेपण, वैशिष्ट्य घेऊनच जन्माला आली. हा लेखक केवळ प्रादेशिक कादंबरीतच अडकला काय ? तो एकमार्गी होता काय ? तर तसेही काही झाले नाही हे आपल्या लक्षात येईल. त्यांचे लेखन किती विविधतापूर्ण होते हे त्यांच्या कादंबऱ्यांच्या नावांवरूनच लक्षात येईल. कॉनन डॉयल हा त्यांचा आवडता लेखक. त्याच्या शेरलॉक होम्सने तर झपाटूनच टाकले होते त्यांना. त्यातून निर्माण झाली एक छानशी आणि स्वतंत्र रहस्यकथा. 'वसंतराव आणि चाळीस चोर' ही कादंबरी कॉनन डॉयलचे अनुकरण नव्हे की भाषांतर नव्हे हे शेरलॉक होम्सच्या फॅन्सना सांगावयास नको. एका प्रत्यक्ष घडलेल्या लहानशा पण हृदयस्पर्शी घटनेचा त्या कलावंतावर तीव्र परिणाम झाला. त्यांचे मन वर्तमानकाळ पार करून भूतकाळात सामंतशाहीच्या, मध्ययुगीन भारताच्या काळात गेले. गुजरी रागाच्या मागोव्यातून एक वेगळाच धुंद करणारी, प्रणयाची बेहोशी अनुभवावयास लावणारी, वाचकाला मंत्रमुग्ध करणारी 'गानलुब्धा मृगनयना' नावाची कादंबरी जन्माला आली. वास्तव आणि कल्पित यांच्या बेमालूम मिश्रणातून एखादा जातिवंत कलावंत कोणती किमया करतो, कशा तऱ्हेची निर्मिती करतो याचे नमुनेदार उदाहरण म्हणजे ही 'गानलुब्धा मृगनयना' नावाची कादंबरी आहे. या कादंबरीची पूर्वपीठिका, निर्मितीला कारणीभूत झालेली घटना, ती साकार करण्यासाठी केलेला अभ्यास त्यांच्या तोंडून ऐकताना मी एका वेगळ्याच वातावरणात शिरलो होतो. ती सारी हकिकत हाच एका लेखाचा विषय होईल.

त्यांच्या कादंबऱ्यांचे रसग्रहण करण्यासाठी, नव्या वाचकांना

ओळख करून देण्यासाठी (आणि ती ओळख करून देणारा मी कोण?) हे लिहीत नाही. त्यांच्या कादंबऱ्या, कथा मुळातूनच वाचल्या पाहिजेत, त्याशिवाय ती धुंदी, तो अफाट पसारा कळणार नाही. त्याचे कादंबरी–विश्व हे जसे एकसूरी, एकसाची नाही तसाच त्याचा स्वभाव, त्याचा बोलकेपणा, त्याचे अनुभवविश्व (जे शब्दरूपाने प्रसिद्ध झाले नाही) आणि आपण जे पाहिले आणि अनुभवले ते इतरांना सागणे, ऐकणाऱ्यासमोर ते सारे जिवंतपणे उभे करणे, हेही तेव्हढेच अपार आणि अफाट होते. त्याचे स्मरण, श्रवण आणि पचन शेवटपर्यंत अत्यंत कार्यक्षम होते. त्याचप्रमाणे ऐकणारा उत्साही आणि दाद देणारा मिळाला की त्याच उत्साहाने सागण्याची त्यांची हौसही अफाट होती. आपल्याला उच्चभ्रूनी, टीकाकारानी, साहित्य-संमेलनाचे अध्यक्षपद कोणाला द्यावे हे ठरविणाऱ्या ठेकेदारांनी बाजूला सारले म्हणून त्याबद्दल त्याना ना खंत वाटली ना त्यानी खेद केला. त्याच्या धबधब्यासारख्या अखंड वाहणाऱ्या वाक्‌गंगेत या खेदाची, खंताची भेसळ झालेली दिसली नाही. निर्मळपणा, प्रवाहीपणा आणि जिवंतपणा यांचाच अनुभव त्यांच्यांशी बोलताना होत असे. कै. चि. वि. जोशी याच्यानंतरचा हा दुसरा गुणी लेखक जो साहित्यिक गटबाजीमुळे अध्यक्षपदाला दुरावला; पण इतिहास नोद करील ती अशी की, 'एका वेगळ्या विश्वाचा वेध घेणारा लेखक साहित्यसमेलनाचा अध्यक्ष झाला नाही!' त्यांच्या अध्यक्ष होण्याच्या नोदीपेक्षा त्याचे अध्यक्ष न होणेच अधिक जाणवेल यात शंकाच नाही. कै. चि. वि. जोशी (विनाकारण) त्या साठमारीच्या, निवडणुकीच्या रणधुमाळीत उतरले तरी होते; पण या मनस्वी, आत्ममग्न, आत्मतृप्त, समाधानी माणसाने अशा मानसन्मानाच्या जागांचा लोभही धरला नाही. त्यांचे हक्काचे स्थान आणि मानसन्मान त्याना मिळाले नाहीत म्हणून त्यांनी कोणावर राग धरला नाही की कोणाबद्दल त्या कारणासाठी अपशब्द वापरला नाही. आपल्या लायकीचे मिळाले नाही म्हणून न खंतावणारा हा लेखक लायकीपेक्षा अवास्तव स्तुती केल्यामुळे पार बिथरून गेला, दुखावला गेला. महाराष्ट्राची, मराठी माणसाची अस्मिता दुखावली गेली असता दिल्लीपतीशी ज्याने झुज दिली असा महाराष्ट्राचा कंठमणी बनलेला (पण पत्नीच्या आग्रहामुळे महाराष्ट्राबाहेर वास्तव्य करणारा) महाराष्ट्राचा थोर सुपुत्र त्यांच्या गावी (खोपोली येथे) एका समारंभानिमित्त आला होता. तो आपल्या मराठी न जाणणाऱ्या पत्नीला–दुर्गाबाई देशमुख यांना–श्री. दिघे याची ओळख करून देताना म्हणाला– 'He is Shivaji at Marathi Literature' ही अवास्तव ओळख त्याना अजिबात आवडली नाही. एवढेच नव्हे तर त्याना त्याचा रागही आला. अनेक वर्षांनंतर त्या प्रसंगाबद्दल बोलताना या अप्रयोजकतेबद्दल नेमका कोणता शब्द वापरावा हेही त्यांना सुचले नाही इतका तो प्रसंग त्याना लागून राहिला होता.

गोष्टीवेल्हाळपणा हा त्यांचा खास विशेष होता. त्याना बोलते करण्याची किमया तुमच्याजवळ असली आणि त्याचे सारे मन लावून ऐकण्याची तयारी असली की ती बैठक रंगलीच म्हणून समजा! खूप आणि विविध (भाषी) वाचन, सतत भ्रमण, मन:पूर्वक चिंतन आणि ते सागण्याचे कौशल्य यामुळे त्याच्या सहवासाचा, त्याचे बोलणे ऐकण्याचा कंटाळा म्हणून येत नसे. खोपोली गावातील पोटभरून मात्र त्याचे कौतुक नसावे. उलट त्यांच्याबद्दल विपरीत, अनुदारपणाचेच उद्‌गार ऐकायला मिळाले. त्याची पहिली भेट फार वर्षांपूर्वी सुप्रसिद्ध लेखक ('साहित्यिक नेहरू' या ग्रंथाबद्दल नेहरू पारितोषिक–सोविएट देशाचे–मिळविलेल्या) श्री. ल. ना. भावे याच्या घरी (डोंबिवली) झाली. ते दोघे एकमेकाचे चाहते आणि म्हणून घनिष्ट, जवळचे मित्र. आम्ही चार–पाचजणच होतो त्या बैठकीत. त्या वेळी त्यानी सागितलेला एक प्रसग. त्या रंगलेल्या मैफलीत असे अनेक प्रसंग, अनुभव त्यांनी सांगितले. वक्ते ते आणि श्रोते आम्ही असा तो सारा मामला होता. त्या वेळेस विषय निघाला हरणाच्या शिकारीचा. कै. दिघे हे पट्टीचे शिकारी. (काही वर्षांपूर्वी घडलेल्या एका प्रसंगामुळे त्यांनी हातात बंदूक न धरण्याचे ठरविले. तो प्रसंग त्यांच्या हळवेपणाचा, कविमनाचा द्योतक आहे यात शंकाच नाही. झाले असे : त्यानी नेम धरून धोबीपक्ष्यावर बार टाकला. त्या पक्ष्याची सारी पिले आकाशात उडालेली त्यांनी पाहिली. ते म्हणाले, 'माझ्यातला शिकारी नाहीसा झाला! त्यानंतर मी पुन्हा कधीही बंदूक हातात धरली नाही.') त्यामुळे शिकारीचे अनुभव त्याच्या गाठी अमाप. ते सागू लागले– 'हरणाची गती तुम्हाला ठाऊक आहे. बाणाने किंवा बदुकीने हरीण टिपणे तसे कठीणच. दिवसभर धावून धावून एखादा मिळाला की तरी नशीब! हॉटेलमध्ये किंवा बड्याच्या घरच्या मेजवानीला हरणाचे मास हवे असते. ही हरणे मारायची कशी? त्यामुळे हरणाच्या शिकारीचे एक वेगळे तंत्र आहे. त्याला शिकार शब्द वापरणे कितपत योग्य आहे ते तुम्हीच ठरवा. दिवसभर चरणे झाल्यावर रात्रीच्या निवात वेळी हरणाचा कळप झाडांच्या खाली रवंथ करीत बसतो. हे शिकारी जवळपास किंवा एखाद्या झाडावर बसतात. त्याच्या हातात असते एखादे नाजुक आणि मधुर आवाज निर्माण करणारे एकतारीसारखे वाद्य. अधूनमधून त्या वाद्यावर बोट फिरवून हलकेच ट्यॅव आवाज काढायचा. त्या तेवढ्या आवाजाने तो कळप रवंथ सोडून चौकस जागा होतो. असे वारंवार कधीकधी रात्रभर करीत बसावे लागते. रवंथ नीट न झाल्यामुळे सकाळी ती हरणे पोट फुटून मरतात. अशा तऱ्हेने एकाच वेळेला अनेक हरणे मिळतात, मिळू शकतात!' त्यानी हा प्रसंग साऱ्या तपशिलानिशी आणि हावभावानी आमच्यासमोर उभा केला. अशा अनेकानेक प्रसंगाचे, अनुभवाचे जरतारी विश्व एखाद्या चित्रपटासारखे आपल्या समोर निर्माण करण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी होते. या अशा विश्वात रमलेल्या माणसाला व्यावहारिक मोठेपणाची मातब्बरी वाटली तरच नवल!

त्याच्या जीवनात तसे जीवघेणे, उध्वस्त करून टाकणारे प्रसग अनेक आले. पुण्यात चांगली चाललेली वकिली अशाच एक अपघातामुळे सोडून खोपोलीला यावे लागले. कन्येच्या अपघाताचा हा धक्का भयानक होता. पुण्यातील सारे सारे सोडून ते खोपोलीला आले. खोपोलीला सुरू झाले एक नवे आणि वेगळे आयुष्य. कोर्टात युक्तिवाद करणारा हा कसलेला वकील, जमीन कसू लागला, काळ्या आईची सेवा करू लागला. शेतकरी आणि लेखक ही दोनच क्षेत्रे त्यानी आपली म्हटली. त्याच्यातला वकील पार नाहीसा झाला की काय असे वाटण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली. त्याच्या काद-

बऱ्यांवरून चित्रपट निघाले. (त्यांपैकी एकही चित्रपट त्यांनी पाहिला नाही हे विशेष !) निर्मात्यांनी बऱ्यापैकी पैसा मिळविला, पण ह्या लेखकाच्या हातावर टिकविल्या काही टिकल्या ! त्यांच्यातला व्यवहारीपणा नाहीसा झाला, त्यांच्यातला वकील संपला असे म्हणावे की त्या साऱ्यांना पुरून उरणारा बेरकीपणा त्या निर्मात्यांच्या ठिकाणी होता कोणास ठाऊक ! त्यांना विचारले तर ते म्हणाले, ' त्यांनी दिले तेवढे घेतले. अधिक मागितले नाहीत हे मात्र खरे.' त्यांना अमाप काही मिळाले असेल तर ते म्हणजे वाचकांचे प्रेम ! 'साहित्यिक मानसन्मानापेक्षा ग्रंथालयातून दिसणारी ( अनेकांनी वाचल्यामुळे ) फाटलेली पुस्तके हा माझा मी मोठा सन्मान मानतो. माझ्या वाचकांनी माझ्यावर उदंड प्रेम केले. मला त्या प्रेमातच सारे काही मिळून पावले आहे !'

एका बाजूने लेखक म्हणून तृप्तीचे, समाधानाचे उद्‌गार काढणारा हा लेखक अतृप्त होता, असमाधानी होता. कोणताही कलावंत तृप्त झाला, समाधान मानू लागला की संपला हे खरे आहे. नाटक लिहावयाचे आहे, शिवकालातील प्रसंगावर एक ऐतिहासिक कादंबरी लिहावयाची आहे, आत्मचरित्र न लिहिता कलाचरित्र लिहीन असे म्हणता म्हणता हा लेखक काळाच्या पडद्याआड गेला ! त्यातले अपुरे-अर्धवट स्वरूपात किती आहे कोणास ठाऊक ! त्यांचा पुनर्जन्मावर विश्वास होता. त्यांना पुन्हा जन्म हवा आहे, तो हे सारे संकल्प पुरे करण्यासाठी असे आपणास वाटणे साहाजिक आहे; पण त्याची मनोकामना वेगळीच होती. ती कामना त्यांच्या मुक्त फिरण्याच्या, निसर्गाचे, विविध पशुपक्ष्यांचे निरीक्षण आणि अभ्यास करण्याच्या छंदाशी साजेशी आहे. त्यांना रमायचे होते पशुपक्ष्यांच्या सान्निध्यात, त्यांचा अभ्यास करण्यात. त्या अभ्यासाचे फलित म्हणून त्यावरील लेखन करण्यात आणि इतरांचे लेखन वाचण्यासाठी, थोडक्यात म्हणजे जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली होण्याएव्हढा दुसरा आनंद त्यांना नाही. तो आनंद लुटण्यासाठी त्यांना पुनर्जन्म हवा होता–आहे.

ही इच्छा निराशेपोटी आलेली नव्हती हे आवर्जून सांगितले पाहिजे. त्यांच्या नव्या कादंबरीची सोत्कंठ वाट पाहणारे असंख्य वाचक ह्या देशी होते. त्याचे कौतुक केवळ वाचकांनी केले आणि मान्यवर टीकाकारांनी त्याची अजिबात उपेक्षा केली, ते दखल घेण्याच्याही लायकीचे लेखक नव्हते, असे या टीकाकारांनी मानले काय ? अर्थात त्याचे उत्तर नाही असेच आहे. त्यांच्यासारख्या लेखकाची उपेक्षा करणे किंवा होणेच शक्य नाही. कारण, मुक्तामाला, मंजुघोषापासून अखंडपणे वाहत असणाऱ्या कादंबरीप्रवाहातील र. वा. दिघे यांच्या कादंबऱ्या हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्या टप्प्याला वगळून, डावलून जाताच येणार नाही. त्यांच्या हयातीतच प्रसिद्ध झालेल्या वाङ्मयाच्या इतिहासातून आणि टीकालेखातून, टीकाग्रंथांतून त्यांच्या निर्मितीबद्दल या मान्यवरांनी काय म्हटले हे पाहू या. आधुनिक मराठी वाङ्मयाचा साक्षेपी इतिहास लिहिणाऱ्या डॉ. अ. ना. देशपांडे यांनी लिहिले 'पृथगात्मक प्रतिभेचा कादंबरीकार'. ते मनःपूर्वक गौरवाने म्हणतात, 'त्यांच्या प्रतिभेने अभिजात ललितलेखनाच्या दिशेने आपली पावले वळविली आहेत; लोकजीवनाच्या दृष्टीने जिव्हाळ्याच्या असलेल्या सामाजिक वा अन्य समस्यांच्या चित्रणाच्या प्रदेशात तिने फारसा संचार केलेला नसला, तरी तिने त्यापेक्षा व्यापक भूमिकेवरून मानवी भावसृष्टीचे अत्यंत सहानुभूतीपूर्वक व समजपूर्वक असे उत्कट आणि परिणामकारक चित्रण केलेले आहे आणि ते चित्रण करताना त्यांनी कल्पनारम्यतेचा कुंचला कधी गडद रीतीने, तर कधी अस्पष्ट रीतीने, पण सर्वत्र कुशलतेने वापरलेला आहे. जानपद भाषेतील वेचक शब्दमण्यांनी अलंकृत झालेल्या भाषासुंदरीची जणू विहारस्थानेच असलेल्या अशा 'पाणकळा' व 'सराई' या प्रादेशिक कादंबऱ्या लिहून दिघ्यांनी मराठीतील ललित शब्दसृष्टीत निसर्गरम्य उपवने फुलविली आहेत.' नुकतेच निधन पावलेले प्रा. ल. ग. जोग हे कादंबरीकार आणि टीकाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'कादंबरी' या प्रबंधात त्यांनी पुढील उद्‌गार काढले आहेत – ते लिहितात, 'मग नवे लेखक नवे, अस्पर्शित, आकर्षक, मुक्त, सकस, रसरशीत जीवनाच्या दिशेने जाऊ लागले. त्यांना एक नवीच जीवन-सुवर्णाची खाण सापडली. ह्यातील सोन्याचा कस कळला नव्हता. पण 'सन्तः परीक्षान्यतरत् भजन्ते।' व्हायला परीक्षेसाठी उभे तर राहिले पाहिजे ! ते उभे राहिले 'पाणकळे'च्या रूपात. श्री. र. वा. दिघे यांनी ह्या नव्या क्रांतीचे यशस्वी निशाण रोवले. सोन्याच्या ह्या खाणीने हा हा म्हणता जुन्या सोन्याला कसात मागे टाकले. अशा रीतीने 'प्रादेशिक कादंबरी'चा जन्म झाला. वि. स. खांडेकरांना लेखक म्हणून मान्यता देण्यास तयार नसणारे, कथाकार, कादंबरीकार, नाटककार, टीकाकार आणि अर्थतज्ज्ञ म्हणून मान्यता पावलेले प्रा. गंगाधर गाडगीळ श्री. दिघे यांच्याबद्दल काय म्हणतात ते पाहू या. त्यांनी आपल्या 'साहित्याचे मानदंड' या लेखसंग्रहात 'सराई'वर लिहिताना म्हटले आहे, 'दिघ्यांचे स्वप्नरंजन भरघोस आहे.' 'दिघ्यांच्या या कादंबरीचा आणखी एक कलात्मक विशेष म्हणजे तिच्यात त्यांनी घातलेली स्वप्नसृष्टी व वास्तवसृष्टी यांची सांगड !' (प्रा. गाडगीळ यांनी वापरलेला 'स्वप्नरंजन' हा शब्द श्री. दिघे यांना मनापासून आवडला होता यात शंकाच नाही). विविध विषयांत सव्यसाचित्व दाखविणारे, आजचे आघाडीचे आणि मान्यवर टीकाकार प्राचार्य नरहर कुरुंदकर काय म्हणतात ? त्यांनी आपल्या 'धार आणि काठ' ह्या प्रबंधात त्यांच्याबद्दल म्हटले, 'रंजनवादी कादंबरीच्या प्रवाहातच श्री. र. वा. दिघे या लेखकाचा उल्लेख केला पाहिजे. दिघे यांची कादंबरी कल्पनेत पाहिलेल्या धुंद निसर्गवर्णनांनी भरलेली आहे. या निसर्गवर्णनातही वाचकाना धुंद करण्याची शक्ती आहे.' येथे एक गोष्ट नमूद केली पाहिजे की प्राचार्य कुरुंदकर, श्री. दिघे यांच्या कादंबरीला वेगळा टप्पा मानीत नाहीत. प्राचार्य कुरुंदकर म्हणतात, 'फडके (ना. सी.) यांच्या कादंबरीपेक्षा हा टप्पा निराळा नाही. कवठेकर व दिघे हा फडक्यांच्याच कादंबरीचा दोन वेगवेगळ्या अंगांनी झालेला विकास आहे.' या मान्यवरांनी त्यांच्याबद्दल काढलेले उद्‌गार वाचले की आपल्या लक्षात येईल की, त्यांच्या हयातीतच त्यांच्या लेखनाची गंभीर दखल घेतली गेली. त्यामुळेच पक्षीतज्ज्ञ म्हणून दुसरा जन्म मिळावा ही त्यांची इच्छा अपयशापोटी, निराशेपोटी नव्हती, तर एखाद्या योद्ध्याने एक

मुलुख जिंकल्यानंतर दुसऱ्या मुलखाकडे नजर वळवावी. तशीच अवस्था श्री. दिघे यांची झाली. लेखनाच्या क्षेत्रात झेंडा रोवल्यानंतर पशुपक्ष्यांचे जीवन न्याहाळावे असे त्यांना वाटू लागणे साहजिकच आहे. लेखनानंतरच त्यांचे प्रेम त्या विषयावर होते. तो छंद वयामुळे ह्या जन्मी साध्य करता येत नाही असे वाटल्यामुळेच त्यांनी दुसरा जन्म पक्षीतज्ज्ञाचा यावा अशी इच्छा व्यक्त केली असावी.

वाढत्या वयाबरोबर प्रतिभा क्षीण न होता अधिकाधिक सतेज होत गेली; पण मनातले, कल्पनेतले प्रत्यक्षात आणण्याजोगी साथ शरीर देत नव्हते. त्यामुळे किती कल्पना, संकल्प अपुरे राहिलेत कोण जाणे! अशा ह्या निसर्गपुत्राला, मराठी भाषेची शान, डौल आणि समृद्धी वाढविणाऱ्या महाराष्ट्रशारदेच्या मानकऱ्याला माझी भावपूर्ण श्रद्धांजली. परमेश्वर त्यांची इच्छा पुरी करो. □

[कै. द. वा. दिघे—मृत्यू दिन ४ जुलै १९८०. जन्म : १८९६]

# पुस्तके

## फुलोरा

### फुलणारे फुलझाड !

तुम्ही खूप वेगवेगळ्या प्रकारची फुलझाडं पाहिली असतील, परंतु 'देवीदास बागूल' नावाचं फुलझाड मात्र फारच थोड्यांनी पाहिलं असेल ! हं. या झाडाच्या नावाबाबतीत जपून रहा, कारण त्यातील 'देवी' ऐवजी चुकून 'देवि' असं लिहिलेलं आणि उच्चारलेलंही त्याला आवडणार नाही.

या झाडाची स्थित्यंतरे तशी विलक्षणच. काही दिवस या झाडाच्या वाटचाला रुक्ष प्राध्यापकी आली होती. वसंतऋतूत पल्लवी फुटावी त्याप्रमाणे मुद्रणशुद्धी, संपादकीय झाडझूड आणि प्राध्यापकी यांच्यातून हे झाड बाहेर पडलं आणि त्याला मुद्रणकलेची, मांडणीची, छायाचित्रकलेची पालवी फुटली आणि ते अचानक जोमात येऊन बहरू लागलं. या बहरण्यामध्ये या झाडानं आपल्या काही लाडक्या हट्टापायी अनेकांशी भांडणं घतली आणि जवळ आलेल्या कित्येकांना फार जवळ येऊ न देता शक्य तितक्या लांब ठेवण्यात आनंद मानला. त्यामुळं तसं हे झाड काही जणांना मुलखावेगळं वाटतं खरं ! टी. व्ही. वर मुलाखती घेण्यासाठी चटावलेल्यांच्या अधाशी नजरेला हे झाड अद्याप कसं पडलं नाही, याचं आश्चर्य वाटण्याऐवजी आनंदच मानावा झालं ! हे झाड आयुष्याच्या निरनिराळ्या ऋतूंत अजून कसं फुलणार—फळणार आहे, याचं भविष्य वर्तविणारे मात्र तोंडघशी पडल्यावाचून राहणार नाहीत. या झाडाच्या व्यवहारी ऋतूतल्या खडबडीत रूपावर जाऊ नका. लेखनरूपी वसंतऋतूत हे झाड असं काही फुलतं, उमलतं आणि रसिकांशी संवाद करू लागतं की काही विचारू नका. पुणे आकाशवाणीवरील रसिकवर साहित्यिक व्यंकटेश माडगूळकर यांनी हे झाड मध्येच नेमकं हेरलं आणि बोलतं केलं. त्यातूनच 'फुलोरा' नावाचं एक सुंदर फूल आपल्यासमोर उमललेलं दिसत आहे. 'फुलोरा' मध्ये बागुलांनी 'शालमली', 'गुलाबी बहावा', 'कदंब', 'शिरीष', 'गुलमोहोर' आणि 'पांढरा चाफा' या फुलझाडांना आपल्या अंतःकरणात साक्षात फुलविण्याचे कार्य केले आहे. या फुलझाडांचे वर्णन करण्यासाठी बागुलांचा खटाटोप नसून त्यांच्या निमित्ताने या पुस्तकात बागुलांनी आपली सौंदर्यान्वेषी दृष्टीच मोठ्या कलात्मकतेने फुलविली आहे.

रेडियोवर बोलावयाचे असल्यामुळे असेल कदाचित् बागुलांनी ह्या फुलझाडांसंबंधाने पहिल्यापासून शेवटपर्यंत रसिकांशी हृदय—संवाद करण्याची दृष्टी ठेविली आहे. कलात्मकतेने एखादे चित्र रेखाटावे तसे बागूल या फुलझाडांच्या अंतरंगात शिरतात आणि त्यांच्यातले निरनिराळ्या ऋतूंतले लावण्य रसरसत्या भावनांनी आपल्यासमोर आविष्कृत करतात. त्रिकाळ रंग बदलणाऱ्या आणि त्रिकाळ सुंदर दिसणाऱ्या 'शालमली'चे चित्र काढण्यापासून सुरुवात होते आहे आणि बागूल बघताबघता त्याच्या रंगारूपात वाचकांना न्हाऊन सोडतात. शालमली हा केवळ सुंदर दिसतो असे नव्हे तर सुंदर ऐकूही येतो आणि त्याचे ओठच सुंदर नसून पोटातही पक्ष्यांना आसरा देणारे हे झाड उदारहृदयी तर आहे आणि थट्टेखोरही कसे आहे हे बागूल सांगतात. या झाडावरील पक्ष्यांचे रसपान वर्णिताना कावळाही त्यात कसा रंगतो आणि त्यामुळे सुंदर दिसायला लागतो, हे बागुलांनीच सांगावे ! शालमलीप्रमाणेच इतर वृक्षसंबंधाने बागूल संवाद करतात, तेव्हा लक्षात येते बागुलांची सूक्ष्म नजर. सुंदर फुलझाडांची स्थित्यंतरे टिपण्याची त्यांची वर्षानुवर्षांची तपश्चर्या आणि सौंदर्यप्रेमी आतुर रसीली वृत्ती. त्यामध्य ह्या झाडांच्या पारंपारिक संकल्पना, त्यांच्याबद्दलचे वेगवेगळे उल्लेख आणि त्यांच्यातील चैतन्यामुळे त्यांची वेगवेगळी व्यक्तिवैशिष्ट्ये बागूल नेमकी टिपतात. विशेषतः एक उत्कृष्ट ललितनिबंध म्हणून 'कदंब' या लेखाकडे बोट दाखवावे लागल. त्याची सुरुवात आणि त्याचा शेवट यामध्ये एक मनोहर नाट्य आहे आणि श्रीकृष्णाच्या पौराणिक संस्कारांचो जोड दिल्यामुळे त्यामध्ये एक वेगळीच

कुमारी प्राप्त झाली आहे.

मांडणी, छपाई या दृष्टीने मराठीतील मुद्रणकलेचा एक उत्तम नमुना म्हणून या पुस्तकाकडे बोट दाखविता येईल. मुद्रणकलेच्या आजच्या महागाईच्या दिवसात हे पुस्तक आहे या स्थितीत छापणे हे केवळ रसिकतेमुळेच शक्य होईल. वास्तविक या सान्या फुलांची सप्तरंगी चित्रे छापली असती, तर काय बहार झाली असती असा विचार येतो. प्रत्येक लेखाच्या सुरुवातीचे पृष्ठ मांडणी म्हणून कोरे ठेवण्यात आले आहे, ते कदाचित या फुलझाडांची चित्रे मिळवून डकविण्यासाठीच असावे! निदान वाचकानी स्वतःला जमेल तसे चित्र तेथे काढून पाहण्यास हरकत नाही. (तशी फुलांची चित्रे वाचकांनीच काढण्यासाठी बागुलानी पुस्तकात खूपच कोरी जागा सोडली आहे.) इतक्या कसोशीने छापण्यात आलेल्या पुस्तकात 'आणि' ऐवजी 'आवी' आणि 'पाकळचा' ऐवजी 'पावळचा' असे ढळढळीत मुद्रणदोष आढळावे, याचे दु:ख होते.

—भीमराव कुलकर्णी

'फुलोरा'
देवीदास बागूल
अनुरूप प्रकाशन, पुणे ४
पृष्ठे : ४०, मूल्य : रुपये सहा

## फिनिक्स निवड

# The White Lions of Timbavati

By Chris McBride, Paddington Press Ltd.
Pages 220, £ 5.95 ( around Rs. 110/- )

पांढऱ्या वाघाविषयी ऐकले होते, पांढऱ्या हत्तीविषयी ऐकले होते; परंतु स्वच्छ स्फटिकासारखे पांढरे सिंह असतात हे मी कधीच ऐकले नव्हते. पांढरे म्हणजे अल्बिनो (श्वेतत्वरोग) असतील असे वाटले; पण हे अल्बिनो नव्हेत. हे सिंह म्हणजे रोगविरहित genetic freaks अल्बिनिझममुळे डोळयाचा रंगसुद्धा थोडा बदलतो. या पांढऱ्या सिंहाचे डोळे अगदी पिवळे व नॉर्मल सिंहासारखेच पण किंचित फिके असतात. हे पांढरे सिंह बच्चे असताना सशासारखे गुबगुबीत असतात व कातडी उत्तर किंवा दक्षिण ध्रुवावरील पांढऱ्या अस्वलासारखी असते.

या पांढऱ्या सिंहामुळे त्यांच्यात एक नवीनच व वेगळी जात निर्माण झाली आहे; परंतु त्यांच्या या पांढऱ्या रंगामुळेच त्यांच्या जातीला धोका निर्माण झाला आहे. कारण ते जिथं रहातात त्या पार्श्वभूमीत त्यांचा रंग मिसळत तर नाहीच, पण थोडासा उठूनच दिसतो. त्यामुळे त्याना Camouflage मिळत नाही व शिकाऱ्याचे आणि शत्रूचे ते सहज सावज बनतात.

सध्या आफ्रिकेत तीन पांढरे सिंह आहेत. (आणखीन असतीलही, पण त्यांचा पत्ता किंवा शोध अजून लागला नाही.) या पुस्तकात असे लिहिले आहे की, या तिन्ही सिंहांचा शोध या पुस्तकाचे लेखक ख्रीस मॅकब्राइडनी १९७५ मध्ये लावला. आफ्रिकेतील ट्रान्सवालच्या उत्तर पूर्वेला तिंबावती नेचर रिझर्व्ह आहे. तिथे एका सिंहाच्या जातीमध्ये हे तीन पांढरे बच्चे लेखकाला सापडले.

सिंहाचा विषय निघाला की 'बॉर्न फ्री'च्या लेखिकेची आठवण येते. जॉय अॅडॅमसन, परवा जिचा ५० शिलिंगच्या फरकासाठी तिच्या नोकराने खून केला ती. श्री. मॅक ब्राइडच्या व जॉय अॅडॅमसनच्या पुस्तकात एक फरक हटकून जाणवतो. सौ. अॅडॅमसनने तिच्या सिंहाशी जो एक rapport साधला होता, त्याला प्राणीविश्वात तोड नाही! माणसं आणि जनावरं यांच्यामधील सुसंवादाचे ते इतके बोलके व भावपूर्ण उदाहरण आहे की, पृथ्वीवरील सर्वच जीवाना प्रेम व ऊब याची किती गरज आहे व त्याची समाधानकारक देवाण-घेवाण फक्त त्या त्या जातीत न होता इतर जातीतही होऊ शकते, याचे Born Free, Living Free व Pippa's Challenge ही पुस्तके उत्तम उदाहरणे आहेत. श्री. मॅक ब्राइडच्या पुस्तकातली ही उणीव दोन गोष्टीनी सहज भरून निघते.

एक म्हणजे त्यांच्या पुस्तकातील रंगीबेरंगी छायाचित्रे इतकी उत्कृष्ट आहेत की पुस्तक न वाचता केवळ हे फोटोच पाहिले तरी सिंहाच्या habitat मध्ये एक ट्रिप मारल्यासारखी वाटते, बस्स! तुमची इझी चेअर काढा. आपली स्वतःची अशी वेगळी खोली असल्याचे भाग्य तुम्हाला लाभले असेल तर दार लावून घ्या व या पुस्तकातील फोटो बघत बसा! आफ्रिकेच्या तिंबावती नेचर रिझर्व्हमध्ये तुम्ही पाऊण तास सफर करून याल. दुसरी गोष्ट म्हणजे श्री. मॅक ब्राइडनी केलेले परिपूर्ण संशोधन. त्यांच्या पुस्तकाची शैलीही ओघवती व स्वच्छ आहे.

या तीन पांढऱ्या सिंहांची नावे टेंबा, टोवी व फ्युमा अशी आहेत.

जगात एका पांढऱ्या वाघाची किंमत पाच लाख असते असे मी ९-३-१९८० च्या सन्डे स्टॅंडर्डमध्ये वाचले होते. मग एका पांढऱ्या सिंहाची किंमत किती असू शकेल याची कल्पनाच केलेली बरी!

श्री. मॅक ब्राइड हे तिंबावतीचेच रहिवासी आहेत. त्यामुळे त्यांच्या पुस्तकात एक प्रकारचा जिवंतपणा आला आहे. त्यांच्या सांगण्यात एक प्रकारची अथॉरिटी आली आहे. लहानपणापासून त्यांचे सर्व वास्तव्य तिथेच झाले. त्यानी वन्य जीवनावर Ph. D. चा एक थिसिस हंबोल्ट स्टट युनिव्हर्सिटी, कॅलिफोर्निया इथे सबमिट केला आहे.

वाघ लाब व उंच गवतात आपला वेळ घालवतो. त्याचा Comouflage म्हणजे त्याचे गवतासारखे चट्टेपट्टे. ठिपक्याचा चित्ता हा झाडाच्या सावलीत ऊन-प्रकाशाच्या ठिपक्यात रहातो म्हणून त्याला काळे ठिपके असतात व तो त्या पार्श्वभूमीत सहज दिसून येत नाही. सिंह तपकिरी पिवळसर असतो व तो त्याच रंगाच्या छोटया गवतात हिंडत असतो. माणसाळलेल्या प्राण्याना पार्श्वभूमीत गडप होण्याची आवश्यकता नसते; पण वन्य प्राण्यांना ते मस्ट असते. नाही तर शत्रू त्याचा फडशा उडवतात

सिंह ज्यांची शिकार करतो ते प्राणी सिंहापेक्षा किती तरी जलद पळू शकतात; पण ते फक्त टॉप गियरमध्ये. सिंह छोटया अंतरापुरती उडी घेत भयानक गतीने पळू शकतो आणि या छोटया अंतरातच आपले भक्ष्य टॉप गियरमध्ये जाण्याआधीच पकडतो. या कारणामुळे तर सिंहाला पार्श्वभूमीमध्ये विलीन होण्याची जास्तच आवश्यकता असते. एक Sine qua non च असतो.

क्वचित् प्रसंगी एखादा पांढरा सिंह जन्माला येतो; परंतु एक-दोन वर्षांत तो त्याच्या पार्श्वभूमीचा तपकिरी पिवळसर रंग उचलतो; पण तीन-चार वर्षं झाली तरी हे तिंबावतीचे सिंह मात्र तसेच पांढरेशुभ्र आहेत. आता तरी ते रंग बदलणार नाहीत असे वाटते. तिंबावती सोडले तर जगाच्या पाठीवर आणखी कुठेच पाढरे सिंह नाहीत.

आधीच सिंहाच्या पिल्लांमध्ये मरणाचे प्रमाण जास्त असते. भूतकाळात काही पाढरी पिल्ले जन्माला येऊन मेली असल्याची शक्यता नाकारता येणार नाही. गिधाडे इतकी बेमालूम सफाई करत असतात, की मागे कोणताच पुरावा रहाणे शक्य नाही. वन्य जीवनात एखादी घटना घडून गेल्या-नंतर पाटी स्वच्छ पुसल्यासारखे होते. आफ्रिकेसारख्या अफाट प्रदेशात थोडे तरी पाढरे सिंह मानवजातीच्या दृष्टीस न पडता पृथ्वीच्या पडद्यावरून सरकले असतील.

पांढऱ्या सिंहाला पार्श्वभूमीत मिसळता येत नसल्यामुळे दिवसा-रात्री शिकार करणे अवघड होऊन बसते. त्यामुळे ते उपाशी मरायची शक्यता असते दुसरे म्हणजे हे सिंह त्यांची प्राईड सोडून दुसऱ्या प्राईडमध्ये गेले तर त्यांचा छळ होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. शिवाय हे पांढरे सिंह पोचर्स किंवा शिकाऱ्यांचे सावजही सहज बनू शकतील. आता तरी तिकडे त्याना शक्य तेवढे संपूर्ण संरक्षण देण्यात येत आहे. वन्य जीवनक्षेत्रात मिळालेले अनुभव व इतर अनेक सामग्री त्याच्या सेवेस सज्ज उभी आहे. अलीकडे काही वन्य प्राण्याना इतकी VVIP ट्रीटमेंट मिळते की टंचाईच्या आणि महागाईने ग्रासलेल्या 'सामान्य' माणसाला आपण एखादे वन्य प्राणी झालो असतो तर काय बहार आली असती असे वाटले तर नवल नाही !

सिंह या प्राण्यावर संशोधन करण्यासाठी श्री. मॅकब्राइड हे सिंहप्रदेशात एक हजार मैल पायी हिंडले. या पुस्तकातील बहुतेक सर्व फोटो त्यांनीच घेतले आहेत.

पान नं. १४३ वर दोन पांढऱ्या सिंहांची तोंडें रक्ताने माखलेली दाखवली आहेत. सर्व चित्र रंगीत असल्यामुळे रक्त बघून टेनिस-नच्या प्रख्यात वाक्याची आठवण येते—

'Nature is red in tooth and claw.'

—जे. एन्. पोंडा

## दलित चळवळ इस्लामच्या दिशेने : पृष्ठ ८ वरून

'आज समाजात आपल्याला थोडीशीही किंमत उरलेली नाही. जोपर्यंत आपण हिंदुधर्मात राहू तोपर्यंत ती मिळण्याची शक्यताही नाही. ख्रिश्चन धर्माने मात्र दलित चळवळीसाठी बऱ्याच चांगल्या गोष्टी केल्या आहेत.

'स्वत.बद्दल बोलायचे झाले तर मी एवढे निश्चित म्हणेन की बौद्धधर्म निरुपयोगी ठरला असल्याने मी हिंदू म्हणूनच नव्हे तर बौद्ध म्हणूनही मरणे पसंत करणार नाही.

मुस्लिमधर्मामध्येही हिंदुधर्माइतकाच भेदाभेद असल्याने तो स्वीकारण्यातही काही स्वारस्य नाही. ख्रिश्चनधर्म मात्र विविध आकर्षणांनी ओतप्रोत भरलेला आहे. भारतीय शिक्षण, कायदा आणि अर्थव्यवस्था (एवढेच नव्हे, संस्कृतीही) पाश्चात्य संस्कृती-वरूनच घेतलेली आहे आणि भारतीय समाजजीवन हे तर ख्रिश्च-निटीचेच एक अंग आहे.

'या स्वरूपाचे परिसंवाद देशात विविध ठिकाणी घडवून आणून दलितसमाजमन नव्या विचारासाठी तयार केले पाहिजे'—इति बी. बसवय्या, सेंट्रल सिल्क बोर्डाचे चेअरमन व येलंदूरहून निवडून आलेले भूतपूर्व आमदार.

### समारोप

एका अर्थाने परिसंवाद यशस्वी झाला असेच म्हटले पाहिजे. ही एक छोटीशी सुरुवात असली तरीही स्वाभिमानाने जगता यावे यासाठी दलित चळवळीत सुरू झालेल्या नव्या विचारांचे ते प्रतिबिंब आहे असेच मानले पाहिजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ संचालित विश्व हिंदू परिषदेच्या पेजावर स्वामींनी हरिजनाच्या मनधरणीचे केलेले सर्व प्रयत्न विफल होत आहेत हेच या परिसंवादावरून स्पष्ट झाले आहे. हिंदुत्वाचा मनोरा कलू लागला आहे. मानवाला सर्वाधिक हवा असलेला स्वाभिमानच जर एखादा धर्म देऊ शकत नसेल तर आर्थिक सवलतींनी तरी त्याला कोणता उत्साह येणार ? उच्च-श्रेणीवर काम करणाऱ्या सुशिक्षित दलितालाही या अस्पृश्यतेच्या शापातून मुक्त होता आलेले नाही. वाराणसी संस्कृत विद्यापीठात डॉ. सपूर्णानंदांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी गेलेल्या बाबू जगजीवनरामांनाही या शापाचे बळी व्हावे लागले आहे.

शासनाने देऊ केलेल्या आर्थिक सवलती आणि राखीव जागांच्या माध्यमातून समाजानेही देऊ केलेले सहकार्य अस्पृश्यसमाजाला सन्माननीय स्थान देऊ शकलेले नाही हे उघड आहे.

गेल्या वर्षी पेजावरस्वामींशी झालेल्या विस्तृत चर्चेनंतरही त्यांच्या-सारखा सवर्णहिंदू भारतीय समाजमनाच्या या 'वैशिष्टया' बद्दल सहमत होऊ शकला नाही. वस्तुतः नीग्रोंच्या प्रश्नाएवढाच हाही प्रश्न महत्त्वाचा आहे. भारतीय समाज व त्याचे अध्वर्यू दलितचळ-वळीला समजून घेण्याचा मनापासून प्रयत्न करीत नसल्यानेच दलित-चळवळीला हा निर्णय घ्यावा लागत आहे. तामिळनाडूत मदुराईजवळ अलीकडेच हजारो दलितांनी इस्लामचा स्वीकार केला आहे. कर्नाटकही त्याच मार्गावर वाटचाल करील असे वाटते.

पण या मार्गात अडचणीही खूप आहेत. वृत्तपत्रसृष्टीतील व सर-कारातील जातीय हिंदू मंडळी हितसंबंधासाठी, निहित स्वार्थासाठी यात अडथळे उत्पन्न करतील, दलितांमध्ये अंतर्गत मतभेद उत्पन्न करतील. ही चळवळ खच्ची करण्यासाठी कुठलाही प्रयत्न शिल्लक ठेवण्यात येणार नाही. दलित समाजाने हे सर्व धोके लक्षात घेऊन जागरूक व्हायला हवे. त्याच्या अस्तित्वासाठी तेवढाच एक मार्ग शिल्लक राहिला आहे एम. राचय्या आणि बी. बसवलिंगप्पा या दोन ज्येष्ठ हरिजननेत्यानी (माजी मंत्री) यापूर्वीच इस्लामचा स्वीकार करण्याचा निर्णय घोषित करून धडक मारली आहे. □

आपल्या स्वकष्टार्जित पैशावर बिनधोक अधिक व्याज कमवा.

# टपाल कचेरी बचत बँक ( उपहार )

**सर्वाधिक आणि करमुक्त व्याज शिवाय ११००० च्या वर रोख बक्षिसे**

**पहिले बक्षीस, रु. १,००,०००**

टपाल कचेरी बचत बँक, देशातील सर्वांत मोठी आणि जुनी बचत बँक आहे. सुमारे ४·२६ कोटी खातेदाराचा या बचत बँकेवर विश्वास आहे. या बँकेतील ठेव-रक्कम रु. १६९५ कोटीच्या वर आहे.

सतत सहा महिने किमान रु. २०० जमा ठेवून आपण दर सहा महिन्यांनी होणाऱ्या सोडतीत बक्षीस जिंकू शकता. आतापर्यंत एक लक्षापेक्षा अधिक लोकांनी बक्षिसे जिंकली आहेत.

**विशेष आकर्षणे**

- केवळ रु. ५ जमा करून खाते उघडता येते.
- ५·५ टक्के व्याज, संपूर्ण करमुक्त.
- आपल्या सेवेत १,२९००० टपालकचेऱ्या शिवाय अनेक फिरत्या टपालकचेऱ्या. एका टपालकचेरीतून दुसऱ्या टपालकचेरीत खाते बदलता येते.
- आपली ठेव गावातील टपाल कचेरीत जमा करून आणि शहरातील मुख्य अथवा उप-टपाल कचेरीतून पैसे काढू शकता. तसेच ठेव शहरातील टपालकचेरीत जमा करून, गावातील टपालकचेरीतून पैसे काढू शकता.
- पैसे काढण्याची सुलभ सोय, पाहिजे तेव्हा पैसे काढू शकता.
- सुमारे २३००० टपालकचेऱ्यातून चेकने पैसे काढण्याची सोय. शिवाय चेकसाठी वटणावळ खर्च नाही.
- सहज ओळख पटण्यासाठी ओळखपत्रे (कार्डे)
- खाते, जामीन म्हणून ठेवता येते.
- नामांकन करण्याची सोय.

आजच कोणत्याही टपालकचेरीत आपले खाते उघडा.

**राष्ट्रीय बचत संघटना**

**पोस्ट बॉक्स ९६, नागपूर–४४०००१**

Davp. 80/105 (Marathi)

हिचकॉकच्या कथा । कथा सहावी

स्वैर अनुवाद । रवींद्र गुर्जर

# दगडावरची रेघ

याच्या टेबलावर विम्याच्या क्लेम्सचे बरेच अर्ज येऊन पडले होते. एक लाख डॉलर्संची मागणी केलेला अर्ज त्यानं बाजूला काढला. त्या रकमेकडे त्यानं अर्धमिनिट पाहिलं. एवढ्या रकमेमुळं कुणी तरी श्रीमंत होणार होतं. सहज गंमत म्हणून त्यानं त्या भाग्यवान व्यक्तीचं नाव वाचलं. मिसेस मेर्विन सीली. त्याच्या अंगावर काटा आला.

फ्रॅन !

त्यानं खुर्ची गोल वळवली आणि पाठी. मागच्या कपाटावरील काचेत आपलं प्रतिबिंब बघितलं. त्याला जाडजूड, गुबगुबीत गालांचा, सरळ नाक आणि व्यवस्थित मिशा राखलेला एक माणूस तिथं दिसला. या व्यतीमध्ये-ह्यूज बॅनरमनमध्ये आणि अफरातफर व खून या आरोपांखाली हव्या असलेल्या एका बँक-कारकुनामध्ये काहीच साम्य दिसत नव्हतं. पंचवीस वर्षांनंतर साम्य कसं राहील? आणि तरीही—

आज बॅनरमन क्लेम्स विभागाचा प्रमुख होता.

तिला पुन्हा बघावं, धोका पत्करून तिला सामोरं जावं का? आपल्याला ते धाडस होईल का? त्याच्या पाठीतून एक चमक गेली. तो विचारानंच उत्तेजित बनला.

ती अतिशय नाजुक आणि सुंदर छोकरी होती. तिच्या घरची गर्भश्रीमंती अधिकच आकर्षक होती, हवीहवीशी वाटणारी होती. पण पैसे मिळवण्यासाठीसुद्धा जवळ पैसे असावे लागतात. म्हणून बँकेच्या पैशावर त्यानं तिला झुलवलं. त्याच्या खाजगी, प्रेमिकांच्या जगात तो 'क्लिकी' होता आणि ती 'विकी' ती जाळ्यात जवळजवळ पूर्णपणे अडकली होती. त्याचं एकदा लग्न झाल्यावर आणि त्यानं तिच्या प्रेमासाठी काय केलं, याची कबुली दिल्यावर ती पै न् पै फेडून टाकेलच, यात काय संशय होता?

योजना निर्दोष होती. कारण तुम्ही पैसे परत केले तर बँका कोर्टात जात बसत नाहीत. ऑडिटरच्या तपासणीला एक वर्ष अवकाश होता. एवढा अवधी पुरेसा होता. ही योजना नक्कीच यशस्वी होणार होती; पण आयत्या वेळी तिच्या भावानं, माईकनं नाक खुपसलं. माईक त्याच बँकेत कॅशियर होता. त्याला संशय यायला लागला होता.

बॅनरमनला 'ती' संध्याकाळ आठवली. माईक त्याला वाटेल तसं बोलला होता.

'वीस हजार डॉलर्स म्हणजे काय चेष्टा आहे?' माईक म्हणाला होता. 'मी फ्रॅन-समोर तुला बजावतो की मला बँकेला रिपोर्ट करावा लागेल. तुझं याबद्दल काय स्पष्टीकरण आहे?'

बॅनरमनच्या खिशात पिस्तूल होतं. ते त्यानं एकदा चाचपलं. अलीकडे तो पिस्तूल नेहमी बाळगत असे, वेळीप्रसंगी हाताशी असावं म्हणून. त्या जोरावरच तो त्या वेळी म्हणाला,

'तुला आणि फ्रॅनला वीस हजार डॉलर्सचं काय? तुमच्याकडे पैशाला काय तोटा आहे? तुम्ही मला यातून सहज सोडवाल. मैत्रीसाठी, प्रेमासाठी!'

फ्रॅन अस्फुट किंचाळली. 'तू काय बोलतोयस?' ती उद्गारली आणि माईक छद्मीपणे म्हणाला, 'फडतूस माणसा, तुझ्यासाठी?'

त्याच वेळी त्यानं पिस्तूल काढलं आणि माईकवर रोखलं. 'पुन्हा बोल!' तो थंड स्वरात म्हणाला. 'जर धमक असेल तर!'

फ्रॅन ओरडली, 'थांब-नको नको!' तिनं पिस्तूल पकडायचा प्रयत्न केला. त्यामुळं त्याला गोळी झाडायला निमित्त मिळालं. माईक असा उलटल्यावर त्याला जगण्याचा अधिकारच काय?

आणि पिस्तूल रिकामं करून बँकेचा तो कारकून कायमचा अदृश्य झाला. त्यानं काही एक मागमूस ठेवला नाही. थोडं नशीब आणि पोलिसांचा गलथानपणा याच्या जोरावर हुशार माणूस सुखात राहू शकतो. प्लॅस्टिक सर्जरी, आवाज आणि आविर्भावात बदल झाला. ह्यूज बॅनरमन हे व्यक्तिमत्त्व उदयास आलं.

त्यानं बेल वाजवून सेक्रेटरीला बोलावून घेतलं. आलेल्या अर्जांची पुढची व्यवस्था हाताखालच्या लोकांवर सोपवायला त्यानं सांगितलं. मिसेस सीलीची फाइल तेवढी त्यानं ठेवून घेतली. तो ओठातल्या ओठात म्हणाला, 'एक लाख म्हणजे बरीच मोठी रक्कम होते. त्यामुळं ही केस मीच हाताळतो!'

सेक्रेटरी निघून गेली. त्यानं फोन उचलला आणि तिचा नंबर फिरवला. मुलाखतीची वेळ तो ठरवणार होता. एवढी रक्कम कंपनीकडे चांगल्या व्याजानं ठेवावी असं तो सुचवणार होता. त्याचा फक्त मोठ्या केसेसशी संबंध येत असे.

पलीकडे फोनची घंटा वाजत होती. तिचा आवाज त्यानं चटकन ओळखला. उत्साह आणि उत्सुकता याचं मिश्रण त्यात होतं. तिचा आवाज मुळीच बदलला नव्हता; पण त्याचा मात्र खूप सरावानं पार बदलला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता तिच्या घरी भेटायची वेळ ठरली.

त्याला काहीच भीती नव्हती. ही चालू नोकरी पकडल्यापासून, गेल्या पाच वर्षांत तो काही जुन्या मित्रांना अधूनमधून भेटला होता. त्याला कोणीच ओळखलं नव्हतं. फ्रॅनचा विषय मुद्दाम काढला तरी त्यांना कसलाही संशय आला नाही. त्यांनी तिचं लग्नानंतरचं नाव त्याला सांगितलं. बऱ्याच वर्षांपूर्वी एका कारकुनानं तिच्या भावाला ठार केलं आणि तो फरारी झाला. एव्हांना तो मेला असावा, अशी कथा त्यानं मित्रां-

कडून ऐकली होती.

बॅनरमनचा कामाच्या संदर्भात प्रसंगी पोलिसांशीसुद्धा संबंध यायचा. बऱ्याच वेळा तो पोलीस इन्स्पेक्टरबरोबर बोलतही बसला होता. या अनुभवामुळं त्याला कसलाही धोका वाटत नव्हता.

त्याला दिवसभर तिच्या आठवणी येत होत्या. उद्या ती भेटली म्हणजे तो म्हणणार होता, 'तुमचे आणि माझे काही मित्र तेच आहेत. तुमच्याबद्दल त्यांनी बरंच सांगितलं आहे. त्यामुळं आपली जुनी ओळख असल्यासारखं वाटतंय.'

आपण अगदी जिव्हाळ्यानं म्हणू, 'तुमची खरोखर धन्य आहे. त्या दु:खद घटनेनंतर तुम्ही नव्यानं जीवन उभं केलंत.' नंतर सौम्यपणे हसून पुढे म्हणावं, 'तुम्हाला कदाचित असं वाटत असेल नाही की, तुम्ही जरा वेड्यासारखं पिस्तूल ओढलं नसतं तर तुमचा भाऊ कदाचित वाचला असता!'

तिच्या विवेकबुद्धीला टोचणी लागायला तेवढं पुरेसं आहे. दोष तिचाच होता अशी तिला जाणीव झाली पाहिजे. तेवढीच त्याला अधिक निश्चिती. तो मुलाखतीची वाट बघू लागला. शेवटी तेच नशिबात असेल तर! त्याच्या पुढे एक आव्हान होतं. तो फक्त ४७ वर्षांचा होता. पुढे काळ मोठा उज्ज्वल होता. काहीही घडण्याची शक्यता होती.

त्या रात्री तो शांत झोपला. एकही स्वप्न पडलं नाही आणि जागा झाला तेव्हा पूर्ण ताजातवाना बनला होता. ब्रेकफास्ट उरकून तो ऑफिसला आला. आलेली पत्रं चाळली. काही पत्राचा मजकूर डिक्टेट केला. नंतर उपनगरातील त्या दिवशीच्या पहिल्या मुलाखतीसाठी तो बाहेर पडला. मिसेस मेर्विन सीली यांच्या घराकडे.

त्या बंगल्याची किंमत निदान पन्नास हजार डॉलर्स असावी, त्यानं अंदाज केला त्याचं बांधकाम कलात्मक होतं. फ्रॅनच्या चोखंदळ आवडीनुसार ते झालं असणार, यात शकाच नव्हती. बाजूला तीन गाड्यांचं गॅरेज उघडं दिसत होतं, सध्या त्यात फक्त एकच 'कन्व्हर्टिबल' दिसत होती. श्रीमंती आहे; पण त्याचं प्रदर्शन नाही. तिच्या घरी एखादा नोकर असावा, कदाचित अर्धा वेळ कामाची बाई, तो अंदाज करत होता. कदाचित फ्रॅन स्वत: दार उघडील; पण त्यालाही त्याची तयारी झाली होती.

त्याला एक गरगरीत, मध्यमवयीन विधवा स्त्री दिसणार होती आणि तिला एक अनोळखी पुरुष—विमा कंपनीचा प्रतिनिधी ह्यूज बॅनरमन.

त्यानं बेल वाजवली आणि तो अधीरपणे वाट पाहू लागला. पावलांचे आवाज ऐकू आले आणि दार उघडलं. तो स्वप्नात होता काय? ती अगदी तरुण, तशीच सुंदर दिसत होती. तिच्यात काहीएक बदल झाला नव्हता. तिचे निळे डोळे जगाविषयीच्या उत्सुकतेनं तसेच चमकत होते. तिची सडसडीत देहयष्टी, तसेच केस क्षणभर तो चक्रावला. तारुण्याचा तो चमत्कार प्रत्यक्ष पाहूनही त्याचा विश्वास बसेना.

"विकी!" तो नकळत उद्गारला.

ती चकित होऊन त्याच्याकडे बघू लागली. नंतर, तिच्या जुन्या सवयीप्रमाणे, त्याच्या या विनोदावर डोळे मिचकावून ती मागे वळली. अगदी त्याच मधुमधुर आवाजात म्हणाली; "आई, बाहेर कोणी तरी आलंय्—त्यांना विकी हवीय्. ती कोण असेल बरं?'

तो हादरला. त्याची एक पायरी चुकली आणि तो छोट्या जिन्यावरून कोलमडला. पहिला मार त्याच्या गुडघ्याला बसला. त्या ठिकाणी अत्यंत वेदना झाल्या तो जमिनीवर आडवा झाला.

तो काही सेकंदच बेशुध्द होता; पण थोडा वेळ तसेच डोळे मिटून पडून राहिला. मेंदूला ताण देऊन तो विचार करत होता. आपली घोडचूक झाली. पण ती सावरता येईल. तशीही वेळ मारून नेता येईल. गांभीर्य काही फार मोठं नाही; असं त्याला वाटलं.

घरातून पावलांचे आवाज आले, कुणी तरी त्याच्याजवळ खाली वाकलं. पण त्यानं फ्रॅन सीलीकडे अजूनही पाहिलं नाही. त्यानं एकदम ठरवून टाकलं, की मुलीच्या ऐकण्यात काही तरी घोटाळा झाला, असा बहाणा करावा. नंतर सरळ निघून जायचं आणि उद्या दुसऱ्या कुणाला तरी पाठवून विम्याचं काम पूर्ण करून घ्यावं.

विकी—सीली—तशी दोन्ही शब्दांत जवळीक आहे. दोन्ही बायकांना बनवणं काय अवघड आहे? अपघातामुळं आधीच त्या गांगरल्या असणार! यापूर्वी त्यानं हा प्रयोग बऱ्याच वेळा केला होता.

स्वत:च्या चातुर्यावर बेहद्द खूष होऊन त्यानं आत्मविश्वासानं डोळे उघडले.

फ्रॅन मोठी झाली होती. थोडीशी जाड पण तोच मोहक चेहरा. त्यावर औदासीन्य दिसत होतं, जणु तिनं खूप काही भोगलं होत. ती काळजीनं त्याच्याकडं बघत होती, 'दुर्घटना' त्याला हात देणार होती.

"माझा गुडघा चांगलाच सडकलाय्," तो थरथरत्या आवाजात म्हणाला.

"मला फारच वाईट वाटतं. तुम्ही उभे राहू शकाल का? म्हणजे मी आणि एथिल तुम्हाला आत घेऊन जाऊ. आमच्या खांद्यावर तुम्ही भार टाका!"

"मी प्रयत्न करतो." तो म्हणाला.

तो कसाबसा उठला आणि दोघींच्या खांद्यांवर हात ठेवून अडखळत घरात शिरला. शेकोटीजवळच्या एका कोचावर त्यानं अंग टाकल. त्या ठिकाणी प्रकाश बेताचा होता. त्याच्या गुडघ्यातून पुन्हा चमक आली आणि डोळ्यासमोर अंधारी पसरली.

"तुम्हाला त्रास द्यायला काही तरीच वाटतंय्." तो म्हणाला, "पण डॉक्टरला फोन केलात तर तो पायाला पट्टी बांधेल आणि मी जाऊ शकेन!"

"या वेळी तुम्हाला व्हिस्कीची गरज आहे' फ्रॅन समजुतीच्या स्वरात म्हणाली, "तुमचा चेहरा किती उतरला आहे." ती मागे वळून म्हणाली, "एथिल, आत जाऊन तेवढी बाटली आणि ग्लास घेऊन येतेस का?"

"आत्ता घेऊन येते!"

मुलगी आत गेली आणि फ्रॅन पुढे झुकली. ती कसल्या तरी विचारात होती, एकाग्र होऊन त्याचा चेहरा बघत होती.

तो विव्हळला आणि त्यान तोंड वळवलं. इतक्या जवळून एखादी-व्यक्ती प्रथमच त्याला बघत होती. इतक्या बारकाईनं त्याला कोण कशाला बघेल?

तो गमतीच्या आवाजात म्हणाला, "तुमच्या मुलीनं नाव ऐकण्यात घोटाळा केला, तसा ड्रिंकमध्ये करणार नाही ना?"

फ्रॅन काहीच बोलली नाही. त्याला वाटलं की सरळ उठावं आणि तिला ढकलून तिथून पळ काढावा. तिच्या तपासणीतून तातडीनं सुटका व्हायला पाहिजे. तिथं बसायचं आणि वाट पाहायची, हे त्याला असह्य झालं.

त्यानं चेहरा हातांनी झाकला. दोन्ही गाल चोळले आणि आळस दिला. वास्तविक त्यानं असं करायला नको होतं. त्याची ही जुनी सवय तिच्या चांगल्या परिचयाची होती.

तो अधिकच गोंधळून म्हणाला, "मला खरोखर पेयाची गरज आहे. इतका वेळ का लागतोय् ?"

अखेरीस ती बोलली, "व्हिस्की !" तिच्या आवाजात तिरस्कार आणि कडवटपणा ओतप्रोत भरला होता. □

(मूळ लेखक : लॉरेन्स ट्रीट)

# चित्रपट

**अपवादात्मक चित्रपटांच्या काहीसा जवळ जाणारा...**

## रेड रोज़

सदानंद बोरसे

'सिगप्पू रोजक्कल' या गाजलेल्या तामिळ चित्रपटावरून निर्माता अेम्. पी. जैन आणि जी. अेन्. शहा यांनी 'रेड रोज़' हा चित्रपट काढला. तामिळ चित्रपटाचे दिग्दर्शक भारती राजा हेच रेड रोज़चेही दिग्दर्शक आहेत.

जीवनात घडलेल्या घटनांच्या आघातांमुळे एखाद्या जबरदस्त मानसिक विकृतीची शिकार बनलेली एखादी गुन्हेगार व्यक्ती हा विषय इंग्रजी चित्रपटांमधून बऱ्याच वेळा हाताळलेला आहे. हिंदी चित्रपटांमध्येही अशा विषयाचा 'मनोविश्लेषण' नामक भाग फक्त वगळून अनेक दरोडेखोर किंवा स्मगलर तो विषय सादर करतात; पण अशा व्यक्तींना मिळालेल्या मजबुरी नामक ढालीचा वापर करीत जे तथाकथित हिरोपण त्यांना बहाल केले जाते ते गाळून घटना, त्यांतून जन्मलेली विकृती आणि मग त्यातून निर्माण झालेली गुन्हेगारी यांवरच आधारित चित्रपट अपवादानेच आढळेल 'रेड रोज़' अशा अपवादात्मक चित्रपटांच्या काहीसा जवळपास जातो.

तेरा–चौदा वर्षांचा एक पोरगा–मुन्ना. सावत्र आईच्या जाचाला कंटाळून हे पोरगे घरातून पळून जाते. एका घरात त्याला आसरा मिळतो. त्या घरातील सोळा–सतरा वर्षांची मुलगी एकदा एकांतात त्याला मिठी मारते; पण त्याच वेळी आलेल्या आई–वडिलांच्या तोंडी मात्र त्याला फेकते. त्या ठिकाणाहून मुन्ना हाकलला जातो–दुसऱ्या एका घरी. त्या ठिकाणच्या मालकिणीकडूनही असाच एक अनुभव. या तीन अनुभवांमधून संपूर्ण स्त्री–जातीबद्दल मुन्नाच्या–आता तो आनंद (राजेश खन्ना) बनलेला असतो; तर आनंदच्या–मनात विलक्षण घृणा, तिरस्कार निर्माण होतो. त्यातूनच एका विकृत गुन्हेगाराचा जन्म होतो. नव्या तरुणीला जाळ्यात अडकवायचे आणि एखाद्या रात्री तिचा खून करायचा, असा परिपाठ हे महाशय सुरू करतात. एक दिवस अचानक शारदा (पूनम धिल्लाँ) नावाच्या तरुणीचा त्यांना शोध लागतो. (या शोधापासून आमचे हे जॅक द रिपर किंवा बोस्टन स्ट्रँगलर एकदम बादशहा शहरियार बनून जातात. तरुणींना मारण्याच्या ऐवजी ते या साध्या, सोज्ज्वळ, सद्गुणी शहराझादबरोबर संसार थाटण्याची स्वप्ने बघायला लागतात.) या ठिकाणाहून सगळा सिनेमा संपतो. एखाद्या अट्टल, अनुभवी फिल्मी प्रेमवीराप्रमाणे हे आनंदबुवा शारदावर अत्यंत मोजून–मापून लाइन मारायला लागतात–शारदा एका दुकानात नोकरीला असत; आनंदबुवा रोज त्या ठिकाणी जाऊन तिच्या काउंटरवर घोटाळायला लागतात, पुढे एकदा तिला लिफ्ट देतात, तिच्याबरोबर सिनेमाला जातात, हॉटेलात जातात, बागेत बागडतात, रोमँटिक डायलॉगबाजी करतात, (एकमेकांच्या स्वप्नात जाऊन) गाणी वगैरेही म्हणतात. हे आनंदचे रूपांतर त्याच्या तोपर्यंतच्या घडणीला अजिबातच साजेसे नाही. त्याच्या आयुष्यात पूर्वीही त्याच्याशी चांगल्या वागणाऱ्या स्त्रिया आल्या असतील; (उदा. घरातून बाहेर पळाल्यावर त्याला आसरा देणारी स्त्री), नंतरही त्याच्या पाहण्यात अशा तरुणी होत्या (उदा. त्याच्याच ऑफिसात काम करणाऱ्या मुली); पण आनंदच्या डोक्यात भिनत त्या उथळ वागणाऱ्या चटकचांदण्या! असे असताना तो शारदाच्या आहारी जाणे केवळ अशक्य. खरे तर, शारदाशी ओळख झाल्यानंतर दोन दिवसांत तिला त्याने घरी नेऊन, मारून सहावा सांगाडा टांगणे हे अधिक सयुक्तिक होते. म्हणूनच काहीही कारण नसताना शारदाच्या शालीनतेने आनंदने भारून जाणे हा चित्रपटातील आत्यंतिक विनोदाचा भाग बनतो. आणखी एक चमत्कारिक प्रकार म्हणजे आनंदचे घर म्हणजे विकृत माणसांचे जणू संमेलनच आहे. आनंदचे (मानलेले) वडील आपल्या बायकोने केलेल्या विश्वासघातामुळे वेडे बनलेले, माळी शेरा कायम बागेत हिंडणाऱ्या उंदरांना मारून त्यांना पुरताना एका चमत्कारिक आनंदाने भारला जाणारा. हा प्रकार चित्रपटात असल्याने फारसे बिघडले नाही; तसेच नसल्यानेही फारसे बिघडले नसते. बरे, आता एवढ्यावर तरी थांबावे ना; पण नाही. आता आनंदरावांचे एवढे रूपांतर झाले आहे म्हटल्यावर शारदाबाई गप्प कशा बसणार ? तिनेही आपले पतिव्रता भारतीय नारीचे कर्तव्य यथास्थित निभावले. त्यामुळे आनंदला पकडून दिल्यानंतरही ही आदर्श पत्नी त्याला भेटायला कायम जेलमध्ये जाते, त्याच्या वाढदिवशी त्याला सफरचंदे देते (an apple

a day वगैरे वगैरे ). बाकी वेडा झालेला आनंदही तुरुंगात फक्त शारदाच्याच नावाची जपमाळ ओढत असतो.

चित्रपटाची कथा, पटकथा आणि दिग्दर्शन अशी संयुक्त कामगिरी भारती राजानी उचलली आहे. आधी उल्लेखलेले दोष वगळता त्यांची कामगिरी सफाईदार आहे. विशेषत: चित्रपटात कित्येक प्रसंगाना त्यानी दिलेले cuts, संवाद वा आठवणीच्या रूपाने घेतलेले संदर्भ आणि विशेषत चित्रपटातील 'रहस्य' नामक प्रकाराभोवती फिरणाऱ्या व चित्रपटात विखरून पेरलेल्या जागा यामुळे पटकथा काही जागी अतिशय पकड घेणारी बनली होती. चित्रपटात अंगदर्शन व प्रत्यंगप्रदर्शन पुरेसे असले तरी एकूण विषयाचा विचार करता ते बरेच कमी आणि संयमित होते, असेच म्हणायला हवे. चित्रपटाच्या शेवटी शारदाचे पळून जाणे आणि आनंदने केलेला तिचा पाठलाग हा भागही विशेषत: राजेश खन्नाच्या अत्यंत चमत्कारिक हालचालीमुळे फारच विनोदी बनला आहे.

'Come-back of the Super-star' असा राजेश खन्नाच्या या चित्रपटातील कामाबद्दल आरडाओरडा झाला होता; पण काही वेळा दिलेले looks, ओठांची थरथर आणि चित्रपटाच्या पूर्वार्धात वापरलेला भेदक, ओलसर आवाज या गोष्टी सोडता त्या आरडाओरड्यातील फोलपणा लक्षात येतो. प्रणयदृश्यामधील त्याची पूर्वीची सहजताही ( बहुधा वयपरत्वे ) आता नाहिशी झाली आहे. एका गोष्टीबद्दल मात्र मानायला हवे,— पूर्वीप्रमाणे स्वत:ची लाट नसतानाही त्याने नायक— खलनायक अशी काहीशी चाकोरीबाहेरची भूमिका स्वीकारली. बाकी पूनम गोड दिसते, गोड हसते इतकेच.

चित्रपटाचे संगीत हा चित्रपटातील सर्वात कष्टदायक भाग होता. दारात शेपटी अडकलेल्या माजरीचा तडफडाट आणि किंचाळघा एवढा एकमेव पार्श्वसंगीताचा भाग आणि चित्रपटातील दोन बरी गीते वगळता बाकीच्या पार्श्वसंगीतामध्ये रोडरोलरचा घरघराट, आदिवासीचे 'हॉ-हॉ हॉऽऽहॉ हॉ' असे ओरडणे, दगड मारलेल्या कुत्र्याचे केकाटणे आदी गोष्टी ठासून भरलेल्या होत्या. या संगीतामुळे अजून काही दिवसात नीलायम थिएटरचे छप्पर उडून गेले तर मला मुळीच आश्चर्य वाटणार नाही.

सरते शेवटी—

डिंपलने घटस्फोटासाठी जो अर्ज केला आहे, तो हा चित्रपट पाहिल्यानंतरच असे म्हणतात. □


नवीन दाखल झालेली पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. | सह्याद्रीच्या कुशीतल्यात ( प्रवासवर्णन )—वसंत चिंचाळकर | रु. १५—०० |
| २. | पोखरण ( कादंबरी )—केशव मेश्राम | रु. १८—०० |
| ३. | पॅरिस, आय लव्ह यू (पॅरिसमधील आठवणी) शांताराम पारपिल्लेवार | १५—०० |
| ४. | घरोघरी ज्ञानेश्वर जन्मती (मूल कसे वाढवावे याचे विधायक मार्गदर्शन)—डॉ. ह. वि. सरदेसाई | १५—०० |

– ENGLISH –

| | | |
|---|---|---|
| 1. | Out ( Mafia Thriller ) – Pierre Rey | $ 2–50 |
| 2. | One Hundred years of solitude ( Bestseller-Novel ) – Garcia Marquez Gabriel | Rs. 23–75 |
| 3. | How to Read a Person Like a Book ( Body Language ) Gerard I Nierenberg & Henry H. Calero | $ 7–95 |

● दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून भरपूर सवलत मिळवा व भाववाढीतून मुक्त व्हा !

दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०.


चित्रपटाबाहेर

## अरे सेन्सॉर सेन्सॉर

कोणत्याही चित्रपटाला किती कात्री लावायची, ती लावण्यासाठी काय निकष लावायचे, 'U' च्या बदल्यात 'A' देताना कात्रीची धार किती कमी करायची इत्यादी गोष्टी ठरविण्यासाठी 'सेन्सॉर' नावाचे एक काही तरी अस्तित्वात आहे, असे म्हणतात. सेन्सॉरचा हा किल्ला आणि तो सर करण्यासाठी, निदान त्याला भगदाड पाडण्यासाठी चित्रपटनिर्मात्यांनी केलेल्या लढाया आणि चढाया हा मोठा संशोधनाचाच विषय होईल. ('सत्यं शिवं 'मधील झीनतसाठी राजकपूरने घातलेला वाद अथवा 'वर ढगाला लागली कळ 'साठी दादा कोंडक्यानी केलेला युक्तिवाद ही अगदी अलीकडची गाजलेली उदाहरणे. ) तर नुकत्याच प्रदर्शित झालेल्या वा होऊ घातलेल्या चार चित्रपटांनाही सेन्सॉरच्या या तापत्या तव्याचे चटके आधी सहन करावे लागत आहेत.

अशा चित्रपटांपैकी एक आहे 'रेड रोज.' भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात पहिल्यादा चित्रपटाच्या ट्रेलरलाही 'A' प्रशस्तिपत्र मिळविण्याचा मान रेड रोजला सेन्सॉरकृपेने मिळाला आहे, सेन्सॉरने प्रथम या चित्रपटावर बंदीच घातली. (यातील

गंमतीचा भाग म्हणजे ज्या तामिळ व तेलगू यशस्वी चित्रपटावरून 'रेड रोज्' हिंदीत काढला गेला, ते चित्रपट मात्र सेन्सॉरने पास केले आणि काहीही बदल न करता उलट थोडासा काटूनच बनविलेला हा लाल गुलाब मात्र बंदीच्या काट्यामध्ये अडकून पडला.) चित्रपटाचे निर्माते अेम्. पी. जैन यांनी या बंदीविरुद्ध पुनर्विचार समितीकडे अर्ज केला. तो समितीने पाच विरुद्ध दोन मतांनी फेटाळून लावला; पण जैन हा प्राणी मोठ्या जिद्दीचा! त्यानी थेट केंद्रीय मंत्रालय गाठून वसंतराव साठ्यानाच चित्रपट दाखवला. (साठेसाहेब त्यांच्या उदारमतवादी धोरणांबद्दल प्रसिद्ध आहेत, म्हणे.) दुसऱ्या दिवशी जैन मुंबईला परतले; तेव्हा 'रेड रोज्' तीन अत्यंत मामुली गोष्टी काढून पास करण्यात आला होता.

निर्माता असगर अली आणि दिग्दर्शक संजयखान यांच्या 'अब्दुल्ला' या राष्ट्रीय एकात्मता व हिंदु-मुस्लिम ऐक्य या विषयावरील चित्रपटावरही सेन्सॉरने 'A' मोहर ठोकली. हे दोन्ही विषय फक्त आणि खास प्रौढांसाठीच आहेत, असे सेन्सॉरचे मत असावे. (आपल्या आणि झीनत अमानच्या वैयक्तिक संबंधांचा गैरफायदा घेऊन संजयने घडविलेले तिचे प्रदर्शन हे पडद्यामागील कारण असल्याची आतील गोटातील बातमी आहे.) निर्माता असगर अली मात्र म्हणाले, 'आमचा चित्रपट खरं म्हणजे सगळ्यासाठी आहे. एका लहान मुलाभोवती फिरणारा हा कौटुंबिक चित्रपट प्रत्येकानं पहावा, असं आम्हाला वाटतं. त्यासाठी मी करामधून सवलतही मागितली आहे. आमच्या चित्रपटाला 'U' सर्टिफिकेट मिळेलच, असा माझा विश्वास आहे आणि जर ते मिळाले नाही, तर मी ते मिळवीन, असा माझा आत्मविश्वास आहे!'

निर्माता प्रसन्न कपूरची तक्रारही अशीच. 'काटा कातळा रुद्रय्या' या तामिळ चित्रपटावरून त्याने 'ज्योती बने ज्वाला' हा चित्रपट बनविला. तामिळ चित्रपट सर्वांसाठी खुला होता, 'ज्योती' ला मात्र सेन्सॉरने 'A' बनविले. प्रसन्न कपूर सेन्सॉरच्या या निर्णयाने हबकलाच! 'माझा चित्रपट सेक्स वा व्हायोलन्सवर आधारित नाही. एका आईची आणि तिच्या मुलाची ही भावनोत्कट कौटुंबिक कथा आहे. जर दक्षिणेकडील मुले ही कथा – तामिळ चित्रपट म्हणून – पाहू शकतात तर मग भारतातील बाकी मुलांनी काय पाप केले आहे?' सेन्सॉरच्या निर्णयामुळे आपल्या चित्रपटाचे प्रदर्शन कसे लांबले व त्यामुळे काय तोटा झाला याचा हिशेबच प्रसन्न कपूरने मांडला. 'माझा चित्रपट सोळा मेला प्रदर्शित व्हायचा होता. या काळात सुटीनिमित्त अनेक पाहुणे मुंबईत असतात. त्यामुळं जवळजवळ पंचवीस ते तीस टक्के धंदा वाढतो. हे सगळं उत्पन्न प्रदर्शनाची तारीख चार आठवडे पुढे ढकल्यामुळं मला घालवावं लागलं!'

आर. एल. स्टीफन्सनच्या 'डॉ. जेकिल् अँड मि. हाअिड्' या कथेवरून राजतिलक 'यानी चेहरे पे चेहरा' हा चित्रपट बनविला. श्री. व सौ. राजतिलक यांच्या मते हा चित्रपट म्हणजे शास्त्रीय कल्पनारम्य कथेवरून खास मुलांसाठी बनविलेला आदर्श चित्रपट आहे आणि तो शाळा–शाळामधून दाखवायला हवा. सेन्सॉरबोर्डाला मात्र हा चित्रपट म्हणजे जबरदस्त परिणाम साधणारा भीतिपट वाटल्यामुळे त्यानी त्यालाही 'फक्त प्रौढांसाठी' बनवून टाकले आहे.

शरीरप्रदर्शन (अश्लीलता) आणि हिंसक प्रसंग (क्रौर्य) या दोन कारणांखाली चित्रपटावर सेन्सॉरबोर्ड हवे तसे अत्याचार करते की या दोन्हीच्या काही व्याख्या ठरलेल्या आहेत आणि त्या निकषाधारेच चित्रपट हाताळला जातो याचे स्पष्टीकरण मात्र सेन्सॉरने कधीच केलेले नाही. □

---

## महापौर निवडणूक : पृष्ठ २ वरून

प्रश्न होताच. म्हणूनच शिवाजीराव आढावांनी आमच्या (भाजप.) सदस्यांची मतं पक्की असतात.' असा टोमणा मारला होता. तेव्हा इतरांनी त्यांना धारेवर धरलं; पण ते तेवढ्यावरच थाबलं.

त्यानंतर एकापाठोपाठ एक नगरसेवक खाजगीत शरदरावाना भेटले आणि भोजन आटोपून महापालिकेकडे रवाना झाले.

पाठोपाठच इंदिरा कॉंग्रेसचेही सदस्य 'सपना' मधून महापालिकेकडे आले. अपक्षानी त्याच्याशी युती केल्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला होता. कारण या युतीमुळे त्यांना २४ अधिक १० अशी चौतीस मतं मिळणार होती. शिवाय अरस काग्रेसमधील चार मतं त्यानी वळवलेली असल्यामुळे एकूण ३८ मतं पारड्यात आली होती. म्हणूनच नारायण खराडे निवडून येणार, अशी खात्री त्यांना वाटत होती. खबरदारी म्हणून, ज्यांच्याबद्दल संशय होता त्यांना मतं बाहेर आणायला सागितलं गेलं होतं.

सगळे दाखल झाले आणि बरोबर दोन वाजता निवडणुकीच्या सभेला सुरुवात झाली.

त्याच वेळी लिफटमध्ये कुसाळकरशेठशी अयाक्ष काझींची भेट झाली. बाहेर पडले तर विजय गायकवाड दिसले. शेठ दोघावरही रागावले. 'बरेच दिवस भेटत नाही, म्हणजे काय? मैत्री नावाची काही चीज आहे की नाही?' वगैरे बोलले. मग मात्र थोड्याच वेळात त्यांचा राग गेला आणि हसत मंडळी सभागृहाकडे वळली.

महापौरपदासाठी अपक्षांनी माघार घेतली. त्यामुळे सुरेश तौर विरुद्ध नारायण खराडे असा सरळ लढा झाला. मतदान व्यवस्थित पार पडलं. महापौर पांडुरंग तरवडे निकालाची कागदपत्रं सह्या करण्यासाठी घेऊन आले आणि सह्या होताच शिवाजीराव भोसले

हसलेले बघितल्यावर पुलोदवाल्यांनी निःश्वास सोडला आणि इंदिरा काँग्रेसवाले मात्र एक एक करून हळूहळू बाहेर पडू लागले.

उपमहापौर मोहन पवार यांच्या खोलीतून फोन फिरू लागले. कुसाळकरशेठनी खडकीवरून खास ढोलीबाजा मागविला.

तेवढ्यात अधिकृत निकाल बाहेर आला. सुरेश तौर ४६, नारायण खराडे २८, एक मत बाद. ही आकडेवारी बघून इंदिरा काँग्रेसवाले संतप्त झाले होते. त्यांना अपक्षांनी धोका दिल्याचं स्पष्ट झालं होतं.

आता इंदिरा काँग्रेसचे काही नगरसेवक ' सतीश देसाईला अविरोध निवडून द्या !' म्हणून सांगू लागले; पण राम मोझेंनी त्याला विरोध केला. काही मिनिटांतच धावपळ सुरू झाली. ' सॅटरडे क्लब ' चा नेता सतीश आपटलाच पाहिजे, अशी तयारी झाली. पुलोद वगैरे आघाड्या बाजूला ठेवून अनेक जण त्यात सामील होताना दिसू लागले.

डॉ. देसाईंच्या मित्रमंडळींनीही प्रति-तयारी सुरू केली. इंदिरा काँग्रेसमधील त्यांचे पूर्वीचे मित्र आणि सध्याचे मित्र चर्चा करू लागले. चर्चा वरच्या मजल्यावरून खाली, तिथून हिरवळीवर आणि तिथून ऑलिम्पिक हॉटेलमध्ये आली. इंदिरा काँग्रेसच्या काही नगरसेवकांनी डॉ. देसाईंना मतं द्यायचं ठरवलं. मंडळी पुन्हा सभागृहात दाखल झाली.

मतदान संपलं. वातावरण तंगच होतं. मतदानाचे आकडे जाहीर होताच सीताराम थोपटेंनी व्यासपीठावर घोषणा दिली, ' गोल्डन गँग मुर्दाबाद !' ' सॅटरडे क्लब झिंदाबाद !'

सतीश देसाई विजयी झाले; पण त्यांना अपेक्षेपेक्षा कमी मतं पडली. फक्त ४३ मतं ! अपेक्षा होती ५६ मतांची. पुलोद आघाडीत ४२ सदस्य होते. अधिकृतरीत्या पुलोद फुटली नव्हती. इंदिरा काँग्रेसवालेही खुषीत होते. मतं फुटली नव्हती, तर अरस काँग्रेसवाल्यांनी डॉ. देसाईंना सुरेख धक्का दिला होता; पण खोखोपटु देसाई त्यांनाही चकविण्यात यशस्वी झाले होते.

अशा रीतीने पुलोद आघाडीचे सुरेश तौर महापौर आणि डॉ. सतीश देसाई उपमहापौर झाले !

निवडीनंतर अनेकांची भाषणं झाली. मावळते उपमहापौर मोहन पवार दिलखुलासपणे सांगून गेले, ' माझ्या वेळचे महापौर नि मी उपमहापौर असे आम्ही दोघेही अशिक्षित होतो, म्हणून आमचा कारभार अशिक्षितांचा झाला. आता नवे महापौर वकील आहेत आणि उपमहापौर डॉक्टर आहेत. या दोघा सुशिक्षितांचा आगामी वर्षाचा कारभार सुशिक्षित असा होवो, हीच अपेक्षा !'

जाता जाता का असेना, उपमहापौरांनी पुणेकर नागरिकांची एक मोठी अपेक्षा बोलून दाखवली, हेही नसे थोडके ! आता नव्या मंडळींचा कारभार कसा होतो, हे पहायचं आहे. कारण आत्ताच कुठे त्यांची कारकीर्द सुरू झाली आहे ! □




लेखकाच्या
मध्यपूर्वेतील
मनमुराद
भटकंतीवर
व
इराणमधील वास्तव्यावर
आधारलेली
नवी लेखमाला
□
यापुढील
९ ऑगस्ट
अंकापासून
सुरुवात
अंकाची किंमत
एक रुपया